
# निर्धार

## वार्षिकांक सत्र २०१५-२०१६

### भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

Accredited with Grade 'B' (CGPA-2.54)
by NAAC, Bangalore



# Our Inspiration



**Hon'ble**
**Late Shri Bhausaheb Mulak**
Ex. Minister, Maharashtra State
Ex. Mayor-NMC, Founder Chairman,
Backward Class Youth Relief Committee, &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur



**Hon'ble**
**Smt. Sumanmala B. Mulak**
Chairperson,
Backward Class Youth Relief Committee, &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur

### Founder's Message :

This is an age of modern science and technology and we are in the 21st century. India is growing economically and technologically and will join the list of 'Developed Nations by year 2020'. This growth is not possible without sound support of technical human resource. We at our college aim at overall development of the personality of an individual by providing best education, technical know how, personality traits and leadership qualities to grow as a manager & a technocrat.

# The Leader



**Hon'ble**
**Shri Rajendra B. Mulak**
Ex. Minister of State (Govt. of Maharashtra)
Finance & Planning, Energy, Water Resourses,
Parliamentary, Affairs & Excise
Hon. Secretary, BCYRC and BMCT



**Hon'ble**
**Smt. Prerna R. Mulak**
Managing Director,
B.C.Y.R.C. & B.M.C.T.,
Nagpur

### An introduction to BCYRC :

Backward Class Youth Relief Committee was founded in 1974 with the primary objective of upliftment of students belonging to Backward Class and Rural Areas. Founded by Late Shri Bhausaheb Mulak, Ex. Minister, Government of Maharashtra, Ex-Mayor of Nagpur Municipal Corporation and a man with vast experience and vision. This organization has grown by leaps and bounds. Shri Rajendra Mulak, Minister of State (Government of Maharashtra) and the Secretary of BCYRC, is an enterprising, dynamic and innovative personality. He is the catalytic force behind the progress of the organization and is a set example of leadership.



**Hon'ble Yashraj R. Mulak**
Treasurer, BCYRC & BMCT, Nagpur



**Shri D. K. Mahadik**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Mrs. Padmaja Shyam Dandge Patil**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Shri Padmakar Agrawal**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Dr. Jobi George**
Principal
Bhiwapur
Mahavidyalaya,
Bhiwapur

## महाविद्यालयाविषयी थोडेसे..........

आमच्या सर्व संस्थेचे संस्थापक, प्रवर्तक व आधारस्तंभ शिक्षणमहर्षी माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक आहेत. मा. भाऊसाहेबांनी ग्रामीण भागातील जनतेचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक व राजकीय जीवन जवळून तर बघितलेच पण त्या जीवनाचा त्यांनी स्वतः अनुभव घेतला. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे ग्रामीण व नागरी जीवनाचे एक सुसंगत एकजिनसी आणि रसाळ मिश्रण होय. मा. भाऊसाहेबांनी मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण उत्थानाकरिता सन १९७४ मध्ये बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटी ह्या संस्थेची नागपूर येथे स्थापना केली. महाराष्ट्राचे दिवंगत नेते व मुख्यमंत्री श्री. मा. सा. उर्फ दादासाहेब कन्नमवार हे गरीब घराण्यात जन्मलेले पण राजकारणात उत्तुंग शिखर गाठलेले वैदर्भीय नेते हे मा. भाऊसाहेबांचे प्रेरणास्थान व राजकीय गुरु होते.

माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी स्वतःला शैक्षणिक चळवळीसाठी वाहून घेतले आहे. व्यावसायिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन कर्मवीर दादासाहेब कन्नमवार अभियांत्रिकी महाविद्यालय, १९८३ साली नागपूर पॉलीटेक्निक व १९८९ मध्ये आयुर्वेद महाविद्यालय ह्या संस्थांची नागपूर येथे स्थापना केली. ह्या नामवंत संस्थेत तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ विदर्भातीलच नव्हे तर पूर्ण देशातील विद्यार्थी घेत आहेत. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटीच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या नागपूर येथील ह्या संस्था माननीय श्री. भाऊसाहेब मुळक यांच्या तडफदार व्यक्तिमत्व आणि उत्कृष्ट कार्यशैलीमुळे थोडयाच काळात भरभराटीस आलेल्या आहेत. त्यांनी कोट्यावधी रुपये खर्च करुन हया संस्थांच्या भव्य वास्तू, प्रांगणे, मुलामुलींची वसतीगृहे, ग्रंथालये, क्रीडांगणे, व अद्यावत उपकरणांनी सज्ज प्रयोगशाळा उभारलेल्या आहेत. ही सर्व महाविद्यालये उच्च शिक्षाविभुषीत प्राध्यापकांनी युक्त आहेत. संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालयात रुग्णांकरिता आंतरविभाग व बाहय विभाग असून गरीब मागासवर्गीय जनता हया दवाखान्यात विनामूल्य लाभ घेत आहेत.

वरील महाविद्यालयीन संस्थांचे कार्य लक्षात घेऊन बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर ह्या शैक्षणिक संस्थेला महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याकरिता प्रोत्साहित केलेले आहे. आपल्या उमरेड ह्या जुन्या निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने व विशेषतः ह्या विभागातील मान्यवरांच्या विनंतीनुसार संस्थेचे संस्थापक – अध्यक्ष माननीय भाऊसाहेब मुळक यांनी भिवापूर ह्या ग्रामीण भागात सन १९९० साली भिवापूर महाविद्यालय भिवापूर स्थापन केले. भिवापूर क्षेत्रातील कमकुवत मागासवर्गीय व होतकरु विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत. विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सवलती उपलब्ध असून विशेषतः पूर्ण वर्गाकरिता विद्यार्थ्यांना पुस्तके देण्याची व्यवस्था केलेली आहे. सन १९९५–९६ सत्रापासून महाविद्यालयाचे वर्ग संस्थेच्या नवीन इमारतीत भरत आहेत. महाविद्यालयाची शैक्षणिक सोईंनी उपयुक्त अशी भव्य वास्तूची निर्मिती पथावर आहे. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात मुलामुलींची वसतीगृहे, कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने, अद्ययावत प्रयोगशाळा, क्रीडांगणे व भव्य ग्रंथालयांची बांधणी करण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

मा. स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी उमरेड निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे महाराष्ट्र विधानसभेवर प्रतिनिधीत्व करुन शासनात मंत्रीपद भुषविले हे सर्वांना माहीतच आहे. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटीच्या माध्यमातून ह्या ग्रामीण भागातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने खालील योजना आखलेल्या आहेत. भाऊसाहेबांनी योजलेल्या प्रकल्पांना पूर्णत्वास नेण्यास व संस्थेच्या विकासासाठी त्यांचे चिरंजीव मा. राजेंद्रजी मुळक उर्फ बाबासाहेब (माजी राज्यमंत्री) सातत्याने प्रयत्नरत असतात. त्यांच्या तडफदार व कार्यप्रवण शैलीमुळेच संस्थांची दिवसेंदिवस भरभराट होत आहे हे लक्षात घ्यावेच लागते. संस्थेचे माननीय सचिव माजी मंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेब यांनी संस्थेच्या

शिक्षण वृक्षाला एक नवीन पालवी दिली. खेडयातील तरुण हा स्वबळावर खंबीरपणे उभा असला पाहिजे यासाठी माननीय माजी राज्य मंत्री राजेंद्र मुळक साहेब यांनी अथक परिश्रमातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक बाबींकडे लक्ष पुरविले व वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनातूनच भिवापूर महाविद्यालयाचा 'निर्धार' पक्का झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले साहित्यिक व कलागुण स्पष्ट व्हावे व विद्यार्थ्यांमध्ये लेखनाच्या संदर्भात नवा जोश निर्माण व्हावा म्हणून 'निर्धार' ची संकल्पना पुढे आली. वाचकांना हा महाविद्यालयीन 'निर्धार' प्रचंड आवडेल अशी अपेक्षा आहे.

* राष्ट्रीय मुल्यांकन परिषद बंगलोर द्वारा महाविद्यालयाचे मुल्यांकन होऊन महाविद्यालयाला 'ब' श्रेणी प्राप्त झाली.
* ग्रामीण भागातील सुशिक्षित महिला, बालक मंदिरे व शिवणकला विद्यालये चालू करण्यास पुढे येत असल्यास त्यांना संस्थेद्वारे आर्थिक सहाय्य व अनुदान देण्याची योजना.
* ग्रामीण भागात महिला गृहद्योग व महिला मंडळांची स्थापना.
* राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत विविध कार्यक्रम राबविल्या जात आहेत. या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेसाठी प्रोत्साहन गुण दिले जातात तसेच आंतर महाविद्यालयीन खेळ/क्रीडा स्पर्धात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन गुण दिले जातात.
* महाविद्यालय परिसरात भव्य सभागृह सामान्य जनतेच्या उपयोगासाठी बांधण्याची योजना लवकरच सुरु होत आहे.
* भिवापूर महाविद्यालयात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इ. विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.) सुरु आहेत.
* भिवापूर महाविद्यालयात बी.लिब., एम. कॉम., एम.बी.ए., एम.एस.सी व विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार आहे. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासाचे शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून संस्था प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे.
* भिवापूर महाविद्यालयात बी.एस.सी. (विज्ञान शाखा) ची सोय विद्यार्थ्यांना नियमितपणे प्राप्त झाली आहे.
* आंतरराष्ट्रीय स्तराचा तरंग तलावाचे – काम पुर्णत्वाच्या वाटेवर.
* भव्य जिम्नॅस्टिक शाळेची सोय उपलब्ध आहे.
* इनडोअर स्टेडीयम व भव्य क्रीडांगण.
* मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची सोय.
* महिला अध्ययन व सेवा केंद्राची स्थापना.
* एन.सी.सी पथकाची स्थापना.
* मुलींकरीता नि:शुल्क ज्युडो कराटे प्रशिक्षण
* मुलींकरीता नि:शुल्क फॅशन डिझाइनिंग अभ्यासक्रम.
* स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र.
* रोजगाराच्या संधीसाठी महाविद्यालयात परिसर मुलाखतीचे आयोजन.
* संगणक व इंटरनेट प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.

डॉ. जोबी जॉर्ज
प्राचार्य
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर.

# संपादकीय

भिवापूर महाविद्यालय भिवापूर या ग्रामीण भागातील **'निर्धार'** हा वार्षिकांक वाचकांच्या हातात देतांना अतिशय आनंद होत आहे. या आधीच्या वार्षिकांकची प्रशंसा झाल्यामुळे हा वार्षिकांक फुलेल, बहरेल व फळास येईल यात शंका नाही. भिवापूर सारख्या ग्रामीण भागात असणारे महाविद्यालय व महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्याच कल्पना, स्फूर्ती, प्रेरणा व प्रतिभेचे सहज सूंदर रुप या वार्षिकांकात सादर झाले आहे.

यशस्वीतेसाठी आमचे महाविद्यालयीन विश्वच प्रेरक ठरते. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांमधील लेखन शैलीचा विकास होऊन समाजाप्रती असलेल्या ऋणानुबंधाची जाणीव या निमित्ताने करुन देण्याच्या दृष्टीकोणातून निर्धार या वार्षिकांकाची संधी आम्हाला मिळाली.

संस्थाचालक स्व. श्री. मा. भाऊसाहेब मुळक यांचे प्रोत्साहन, संस्थेचे सचिव माजी मंत्री ना. राजेंद्रबाबु मुळक व महाविद्यालयाचे कर्तबगार प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या प्रयत्नांनी वरिष्ठ विभागात झाली. (बी.एस.सी.) विज्ञान शाखेची सोय तालुका स्तरावर या महाविद्यालयात झाली आहे. त्यामुळे कनिष्ठ शाखेपासून पदव्युत्तर कला शाखा व पदवीपर्यंत वाणिज्य, विज्ञान शाखेची सोय विद्यार्थ्यांना मिळाली आहे. संस्थेचे सचिव, माजी मंत्री मा. राजेंद्रबाबु मुळक यांनी ग्रामीण भागाशी जवळीक साधून समाजाची सेवा करण्याचा मार्ग पत्करला आहे. संस्थेचे ऋण कधीच विसरता येत नाही.

महाविद्यालयाने या भागात अन्यत्र कोठेही नसलेला पदव्युत्तर अभ्यासक्रम (समाजशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र) उपलब्ध करुन दिले आहेत. सोबतच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शाखेची सुरुवात कनिष्ठ व वरिष्ठ विभागात झाल्यामुळे या परिसरातील विद्यार्थ्यांना 'जो जे वांछिल तो ते लाहो' या संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील उक्तीप्रमाणे वर्ग ११ वी ते पदवी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची सोय देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा हवा तो मार्ग पत्करावा या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा हे एक आव्हानच.

साहित्यिक व रसिकांच्या मधला दुवा साधून आम्ही 'निर्धार' रसिकार्पण करीत आहोत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची साहित्य सृजन निर्धारच्या माध्यमातून साकार होतांना अंकातील सर्वच लेखनाशी आम्ही सहमत आहोत असे नाही. तसेच या वार्षिकांकात समाविष्ठ झालेले साहित्य ही विद्यार्थ्यांची स्वतःची व संकलित केलेली लेखनकृती आहे असे गृहीत धरुन त्यांच्या साहित्याला स्थान दिले आहे. मागील अंकाप्रमाणे हा ही अंक सर्वांना आवडावा अशी अपेक्षा.

वार्षिकांकातर्फे सर्वांना शुभकामना!

**संपादक**
कु. निधी साबळे (मराठी)
कु. रंजना चौधरी (हिंदी)
कु. मोनिका सावरकर (इंग्रजी)

**मुखपृष्ठकार**
कु. अपर्णा दुधे

**मार्गदर्शक**
डॉ. मधुकर नंदनवार
प्रा. सोमेश्वर वासेकर
डॉ. राहील कुरैशी

(या अंकातील सर्वच लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

## बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर

र.नं. महा. १५२/७४ नागपूर.

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. सौ. सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. श्री. वामनराव गोविंदराव मुळक | – | उपाध्यक्ष |
| ३. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सचिव |
| ४. श्रीमती श्रीलेखा राजन लांजेकर | – | सहसचिव |
| ५. श्री. यशराज राजेंद्र मुळक | – | कोषाध्यक्ष |
| ६. श्री. दिलीप कृष्णराव महाडीक | – | सदस्य |
| ७. श्रीमती पद्मजाताई श्याम दांडगे पाटील | – | सदस्या |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर, जि. नागपूर

दूरध्वनी क्र. २३२३४९ (एस.टी.डी. ०७१०६)

## स्थानिक व्यवस्थापन मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सदस्य |
| ३. श्री. डॉ. जोबी जॉर्ज (प्राचार्य) | – | सचिव |
| ४. श्री. पद्माकर कुंजीलालजी अग्रवाल | – | सदस्य |
| ५. श्री. डी. के. महाडीक | – | सदस्य |
| ६. श्रीमती पद्मजाताई श्याम दांडगे पाटील | – | सदस्या |
| ७. डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे | – | शिक्षक प्रतिनिधी |
| ८. श्री. विजय शंकरराव दिघोरे | – | शिक्षक प्रतिनिधी |
| ९. श्री. मोतीराज रामदासजी चव्हाण | – | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. श्री. सुभाष गणपतराव ढोक | – | शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी |

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## महाविद्यालय प्रतिनिधी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | अध्यक्ष |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | प्रभारी प्राध्यापक |
| ३. | प्रा. अनिता महावादिवार | विद्यार्थी परिषद प्रभारी |
| ४. | डॉ. विजय दिघोरे | रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी |
| ५. | डॉ. मोतीराज चव्हाण | वि.स.रा.से. योजना |
| ६. | डॉ. मधुकर वि. नंदनवार | सांस्कृतिक विभाग प्रमुख |
| ७. | प्रा. आदित्य सारवे | क्रीडा विभाग प्रमुख |
| ८. | आशिष गायकवाड | विद्यार्थी क्रीडा प्रमुख |
| ९. | प्रविण चौधरी | सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी |
| १०. | कु. मयुरी नंदरधने | रा.से.यो विद्यार्थी प्रतिनिधी |

## विद्यार्थी साहित्य मंडळ

कु. कु. निधी साबळे
आशिष गायकवाड
संगिता वावरे
कु. रश्मी वारकर
प्रविण चौधरी
कु. कोमल ढोणे

## मार्गदर्शक

डॉ. मधुकर नंदनवार
डॉ. सुनिल शिंदे
डॉ. मोतीराज चव्हाण
डॉ. राहिल कुरैशी
डॉ. विजय दिघोरे
डॉ. अनिता महावादिवार

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) कला

| | |
|---|---|
| १. डॉ. जोबी जॉर्ज | प्राचार्य (इंग्रजी) |
| २. डॉ. सुनिल कृ. शिंदे | प्राध्यापक (अर्थशास्त्र) |
| ३. डॉ. मंगेश व. कडू | प्राध्यापक (राज्यशास्त्र) |
| ४. डॉ. मोतीराज रा. चव्हाण | प्राध्यापक (इतिहास) |
| ५. डॉ. मधुकर वि. नंदनवार | प्राध्यापक (मराठी) |
| ६. डॉ. विजय शं दिघोरे | प्राध्यापक (समाजशास्त्र) |
| ७. डॉ. राहील कुरैशी | प्राध्यापक (इंग्रजी) |
| ८. प्रा. सोमेश्वर वासेकर | प्राध्यापक (इंग्रजी) |
| ९. प्रा. आदित्य सारवे | प्राध्यापक (शारीरिक शिक्षण) |

## वाणिज्य विभाग वरीष्ठ व कनिष्ठ

| | |
|---|---|
| १. डॉ. अनिता महावादीवार | प्राध्यापिका वाणिज्य |
| २. डॉ. राजेश बहुरुपी | प्राध्यापक वाणिज्य |
| ३. प्रा. कु. वर्षा मेश्राम | प्राध्यापिका (वाणिज्य) घड्याळी तासिका |

## प्राध्यापक वृंद (कनिष्ठ विभाग) कला शाखा व विज्ञान शाखा

| | | |
|---|---|---|
| १. प्रा. किशोर घ. शेंडे | – | (राज्यशास्त्र, इतिहास) |
| २. प्रा. उषा ना. चु–हे | – | (मराठी, समाजशास्त्र) |
| ३. प्रा. वैशाली प्र. रहाटे | – | (इंग्रजी, अर्थशास्त्र) |

## विज्ञान शाखा कनिष्ठ व वरिष्ठ विभाग (घड्याळी तासीका)

| | |
|---|---|
| १. प्रा. सागर यादव | 2. प्रा. बालपांडे |
| ३. प्रा. ठाकरे | ४. प्रा. कु. बान्ते |
| ५. प्रा. कु. सोमकुवर | ६. प्रा. डाखोळे |

## शिक्षकेतर कर्मचारी वृंद

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सुभाष ग. ढोक | — | अधिक्षक |
| २. श्री. सुधाकर ग. उईके | — | वरिष्ठ लिपीक |
| ३. श्री. संजय मेश्राम | — | कनिष्ठ लिपीक |
| ४. श्री. अमोल वि. भगत | — | कनिष्ठ लिपीक |
| ५. श्री. शंकर को. फेंडर | — | शिपाई |
| ६. श्री. रत्नाकर रा. कन्नाके | — | शिपाई |
| ७. श्री. अ. जफार अ. गफ्फार | — | शिपाई |
| ८. श्री. गुलाब र. गेडेकर | — | ग्रंथालय परिचर |
| ९. श्रीमती सविता म. झोडापे | — | शिपाई |

# मराठी विभाग
## संपादक



## प्रविण चौधरी

## मार्गदर्शक
## प्रा. डॉ. मधुकर नंदनवार



## आद्य शिक्षिका

सावित्रीजींनी भिडे वाड्यात पहिली
मुलींची शाळा भरवली होती
विरोध अन तिरस्कार करणाऱ्या
सनातन्यांची डोके फिरविली होती.
या शैक्षणिक कार्यात साथीला,
फातिमाजी शेख होत्या
पंतप्रधानपदी विराजमान झालेल्या
इंदिराजी लेक होत्या.
त्याकाळी महिला शिक्षणास
सामाजिक बंदी होती
स्वगृहा शाळा उघडून
मुलींना दिलेली संधी होती.
जातीय धार्मिक, सामाजिक
बंधने त्यांनी तोडून टाकले.
पण आज मुलींनी शिकून सवरुन
सर्वच रेकॉर्ड मोडून
माता सावित्रीचा वाढवला मान.

सिकंदर धनविजय
बी.ए. तृतीय



## आमुची भारतमाता

रात्र संपली काळोखाची
दिवस उगवला नवा
आळस झटकुनी दुर्विचारांचा
नवचैतन्य दाखवा ।।1।।
वंदन करुनी भारतमातेस
करु दिवसाची सुरुवात
संकट येता जाऊ समोर
करु त्यावर मात ।।2।।
भारतमाता आमुची आई
आम्ही तिची लेकरे
लडखडलो जर कधीतरी
तीच आम्हां सावरे ।।3।।
रक्षण करण्यासाठी मातेचे
करु सर्वस्वी बलिदान
तन मन धन तिला अर्पुनी
देऊ त्यागुनी प्राण ।।4।।

प्रविण चौधरी
बी.ए. तृतीय


## जीवन

"हे मानवा केवळ जन्माला
आलं म्हणून जगू नको.
तू स्वार्थासाठी का जगतोस
हेच कळत नाही.
स्वार्थांमुळे मित्र नाते
संबंध दुरावतात,
तरीही तू स्वार्थाच्याच
मागे का धावतो
हेच कळत नाही.
आहे जीवन चार दिवसाचे
बनव ते परोपकाराचे
बनव ते शांतीचे, प्रेमाचे, वात्सल्याचे।"

सारंग लांजेवार
बी.ए. प्रथम

## आत्महत्या

आत्महत्या करणे हे एक वेड आहे
समजूनही करती ती एक वेळ आहे ।।1।।
कारण अनेक प्रसंगही अनेक आगतिक
डोक्यात शिरलेला खेळ आहे ।।2।।
वास्तव अवास्तव असे काहीही
अनंत विचारांचा तो मेळ आहे ।।3।।
कोणाला फायदा अन तोटा कोणाचा
न कळत झालेली ही परतफेड आहे ।।4।।
का केले कशाला ? मरणाअंती सारे प्रश्न समाजात
घोळके करती ए टू झेड आहे ।।5।।



## जगणं

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकांस दिसत नाही.
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकांस दोष देऊन
नित्य चाले वाद विवाद
धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
हृदयाचे पाऊल कधी
हृदयाकडे वळत नाही.
इतकं जगून झालं पण
जगायला वेळ नाही
जगत आहो कशासाठी
कशालाच कशाचा मेळ नाही.
क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास.
अजुनही वेळ आहे
थोडे तरी जगून घ्या.
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या.

सुदर्शन मेश्राम
बी.कॉम. प्रथम

## प्रिय मुली,

लक्षात ठेव पोरी, तु तुकडा आहेस काळजाचा
विपरीत काही घडलं, तर जीव जाईल आमचा ।।धृ।।
तुला घराबाहेर पाठवायला, मन आमचं मानत नाही
पण शिक्षणापासून तुला दूर ठेवावं, असही वाटत नाही
तळहातावरच्या फोडा प्रमाणे जपलय तुला काळजीने
जाणीव ठेव त्याची आणि झेंडा लाव तुझा यशाचा ।।धृ।।
उच्छल, धांदरट राहू नकोस, घालवू नकोस
आरशापुढे उभे राहून वेळ वाया घालवू नकोस
मोहात कसल्या पडू नकोस, अभ्यास करणे विसरु नकोस
पैसे देऊन ही मिळणार नाही, तुझा वेळ आहे लाख मोलाचा।।1।।
मग जीवन तुझं कोरं पान, त्यावर नाव कुणाचं लिहू नकोस
स्पर्श मायेचा की वासनेचा भेद करण्यास तु चुकू नकोस
परक्यावर विश्वास करु नकोस, आदर गुरुजनांचा करावा ।।2।।
देहाचे प्रदर्शन करण्यासाठी, संस्कार कपडे टाकू नकोस
लाज वाटेल असं काही करण्यासाठी चेहरा उगाच झाकू नकोस
चुकांना येथे नसतेच कधी माफी, गेलेली अब्रु ही परत येत नाही
मुलीच्या चालण्या बोलण्याकडे, सतत डोळा असतो. ।।3।।
असं विपरीत घडत असलं तरी आमचा
तुझ्यावर समाजाचा विश्वास आहे
जिजाऊ सावित्री आणि अहिल्या किरण बेदीही
तुझा आदर्श आहे.
युग आहे गुणाचं स्पर्धेचं हिमतीने तु संघर्षही करशील
मात्र अश्या वरती स्वार होण्या लगाम लागतो संयमाचा

कु. सावन खांदे
बी.ए. तृतीय






## दादा तु असच कर !

शेतकरी होईल सुखी म्हणून निवडून यायले दिलं,
होतं नव्हतं ते सारं, अडीनचं घेऊन गेलं.
शेतकरी दादा तु असं कर,
बिना अन्नापाण्यानं उपाशीच मर, उपाशीच मर !
दादा तु
निवडून दिलं काऊन, होईल बा फायदा,
पीक गेलं–आलं आम्ही काय करु ? हा कोणता कायदा,
दादा तुला
आमिष दाखवून निवडणुकीत बहुफरक बाजी मारली,
कुठे गेले आश्वासन त्याचे, फुकट चिरकांडी मारली.
मी म्हणतो
काही नाही दादा या नेत्यांचा भरवसा
कधी खातील गोबर, खातील कधी कोळसा,
आम्हा जनतेला
घटनेने दिले देशा, पुष्कळ सारे नियम,
पण मग त्यांना काय ? त्यांनीही राहावं जबानाला कायम
दादा तुझ्या माझ्या
साऱ्या योजना साले, घालतात खिशात
मग अर्थच काय, आश्वासनाच्या खोट्या बोलण्यात
दादा तुझ्यासाठी
रागाच्या भरात दादा तु पाड एखाद्याची लाश
मग बघ दादा कसा होत नाही तुझ्या गावाचा
आणि देशाचा 'विकास'
शेतकरी दादा तु असच कर
बिना अन्नापाण्यानं उपाशीच मर, उपाशीच मर !

सुनंदा घुमे
बी.ए. प्रथम





## असे जगावे

राब राब राबुन बैल
कमाऊन धन देतात
सांगा बरं कोणाकडून
ते निवृत्ती वेतन घेतात ?
कास्तकाराची जात आपली
आपणही हे शिकलं पाहिजे
पिंपळाच्या रोपासारखं
पाषाणावर टिकलं पाहिजे.
कोण करतो सांगा त्यांना
पुरस्काराने सम्मानित
तरीही मोर फुलवितो पिसारा
अन् कोकीळ गाते मंजूळ गीत
मधमाशीची दृष्टी ठेव
फुलांची काही कमी नाही
मधाच्या पोळयासाठी मित्रा
कोणतीची रोजगार हमी नाही.
घाबरु नको कर्जाला
भय, चिंता फासावर टांग
जीव एवढा स्वस्त नाय
सावकाराला ठणकावून सांग.
काळ्या आईचा लेक कधी
संकटापुढे झुकला का ?
कितीही तापला सूर्य
तरी समुद्र कधी सुकला का ?
निर्धाराच्या वाटेवर
हाक निर्भिडपणे पाय
तू एक फक्त विश्वास ठेव
पुन्हा सुगी देईल धरणी माय.
निर्धाराने जिंकू आपण
पुन्हा यशाचा गड
आयुष्याची लढाई फक्त
हिंमतीने लढ।

कोमल ढोणे
बी.कॉम. प्रथम



## ती कोण होती

मी एकदा रस्त्यावरुन एकटाच चालत होतो
तेव्हा मनाशी एकटाच बोलत होतो
बोलता बोलता माझे लक्ष रस्त्याच्या कडेला गेले
आणि चालता- चालता एकाएकीच थबकले
ते दृश्य पाहिल्यावर मन माझे भरुन आले
पण काम कसे करावे मन माझे गोंधळले
गोंधळलेल्या मनाला मी कसे बसे सावरले
परिस्थितीला सामोरे जाण्यास मी थोडा सरसावलो
विचार करुन परिस्थितीचा आढावा मी घेतला
तिच्याजवळ जाण्याचा मनःनिश्चय केला
हिंमत केली नि तिच्याजवळ गेलो
मोठया प्रेमाने मी तिला कुशीत अलगद घेतले
कारण ती जखमी अवस्थेत रस्त्यावर पडली होती
मदती अभावी रस्त्याच्या कडेला तडफडत होती.
प्रथम जखमेला कुरवाळून मी तिची जखम बांधली
आणि नंतर पाणी पाजून तिला हिंमत दिली
त्यावेळेस मी तिचा आनंद पाहून मनोमन खुश झालो.
प्रश्न पडला असेलच ती नेमकी कोण होती
दुसरी कोणी नसून ती एक कोकीळा (पक्षीण) होती.

प्रविण चौधरी
बी.ए. तृतीय

## भ्रूणहत्या



माझ्यावरच सर्व अवलंबून
लक्ष्मी म्हणतात मला
देवता मानतात मला आणि
का गर्भातच मारतात मला
तरी असे का ?
मुलगी आहे मी कामाची
बहीण आहे मी राखी त्योहाराची
पत्नी आहे मी संस्काराची
आई आहे मी भविष्याची
आजी आहे मी अनुभवाची
तरी असे का ?
उच्चशिक्षणास बाहेर जाण्यास मनाई
सामाजिक बांधिलकी ती माझ्यावरती
आरक्षण मलाच का ? दुबळं समजतात
चुक आणि अन्याय बदनाम, लाज माझी
तरी असे का ?
मला का दोषी ठरवतात ?
तो ढग आहे म्हणून वर्षाव करणार
आणि मी जमीन म्हणून सहन करणार
अशी ही रुढ, परंपरा चालत आहे.
तरी असे का ?
वारसा हक्क नाही मला
मी चुकलो तरी आई दोषी,
हुंडा मीच का दयावा
नवीन पाऊल उचलले तर
पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा
तरी असे का ?
मला काही विद्वानांनी ओळखलं
म्हणून माझी प्रगती झाली,
रोपट्याचे वृक्ष झाले मी
त्या सावित्री फुले, किरण बेदी,
राणी लक्ष्मीबाई ह्या सर्व सावित्रींना
कोटी–कोटी प्रणाम असो.
नका मारु मला, जगू दया
मी च समजू शकते सर्वांना
मी नाही तर मानवी सृष्टी नाही
तरी असे का ?

रुपाली नागदेवे
बी.एस.सी. प्रथम

## स्त्री

स्त्री ही मातीचा पुतळा असते
ती जिवंत असते पण निर्जिव असते.
तिला बोलता येते, पण मुकी असते.
तिला चालता येते पण रितिरिवाजाने
तिचे पाय मोडले असते.
ती बापाची मुलगी असते
पण ती पोरकी असते
तिला घर असते पण
ती बेघर असते.
ती पत्नी असते पण ती नोलकरीण असते.
तिच्यात दुःख पचविण्याची शक्ती असते.
कारण ती त्यागाची मूर्ती असते.

अदिती ठाकरे
बी.कॉम. प्रथम

# बाप ...... बाप ...... बाप ......

बापाची परिभाषा काय ?
बाप म्हणजे काय ?
दिवसभर राबुन घाम गाळून
घरी दोन पैसे आणतो
तो म्हणजे बाप .....
त्या पैशातून स्वतः न खाता
मुलांसाठी खाऊ आणणारा
तो म्हणजे बाप .....
मुलांना दिवाळीत कपडे घेणारा
व स्वतः फाटके कपडे घालणारा
तो म्हणजे बाप .....
स्वतः डब्बा मोबाईल वापरतो पण
मुलाला महागडा मोबाईल घेऊन देणारा
तो म्हणजे बाप .....
लायकी नसतांना मुलाला शिक्षणासाठी
शहरात पाठवणारा
तो म्हणजे बाप .....
डोळ्याची पापणी जरी आई असली
पण त्या पापणीचे काजळ म्हणजे बाप .....
आई चूल पेटवून स्वयंपाक करते
पण त्या चुलीला लागणाऱ्या काड्या फोडणारा
तो म्हणजे बाप .....
स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी
पण त्या आईच्या संसाराचा धनी
तो म्हणजे बाप ....

प्रदीप ठवरे
बी.ए. तृतीय



# आई

आई वरती लिहिण्याऐपत नाही माझे व्यक्तिमत्व मोठ
जीवन हे शेत तर आई म्हणजे विहीर
जीवन हे नौका तर आई म्हणजे तीर
जीवन हे शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुट्टी
आई तु उन्हामधली सावली
आई तु पावसातली छत्री
आई तु थंडीतली शाल
आता यावीत दुःखे खुशाल
आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावं असं थंडगार पाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी अशी लयबद्ध टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची सर्वात पहिली आरोळी.

निकिता वारकर
बी.एस.सी. प्रथम

## पाऊस आलाय



पाऊस आलाय ...... भिजून घ्या
थोडा मातीचा गंध घ्या
थोडा मोराचा छंद घ्या
उरात भरुन आनंद घ्या
आलाय पाऊस ....... भिजून घ्या
बघा समुद्र उसळतोय
वारा ढगांना घुसळतोय
तुम्हीही त्यांच्यात मिसळून घ्या
आलाय पाऊस ....... भिजून घ्या
ऑफीस रोजच गाठत असतं
काम नेहमीच साठत असतं
मनातून भिजावसं वाटत असतं
मनाची हौस पुरवून घ्या
आलाय पाऊस ....... भिजून घ्या
सर्दी पडसे रोजचेच
त्याला औषध तेच तेच
प्यायचेच आहे नंतर काढे
आधी अमृत पिऊन घ्या
आलाय पाऊस ....... भिजून घ्या
बघा निसर्ग बहरलाय
गारव्याने देहही शहारलाय
मनही थोडं मोहरुन घ्या
आलाय पाऊस ....... भिजून घ्या

## माझी मैत्रीण

एक मुलगी होती
दिसायला सुंदर होती
रंगाने मात्र काळी गोरी होती
जाडी होती ना पतली होती
उंच होती ना ठेंगणी होती
पायात पैंजण घालीत होती
छोटीशी पर्स ठेवीत होती
कपाळाला टिकली लावीत नव्हती
कारण ती मुस्लिम होती.
नखाला नेलपॉलिश लावीत होती
पायात सॅंडल घालीत होती
केस काळे व लांब होते
साधी सुधी राहात होती
अभ्यासात खूप हुशार होती
स्वतःला स्मार्ट समजत होती
भिवापुर महाविद्यालयात शिकत होती
माहित आहे का तुम्हाला कोण होती
ती तर माझी आवडती मैत्रीण 'निशाद' होती.

पुजा सेलोरे
बी.ए. द्वितीय




## रात शाळा

काढली सरकारने गावोगावी रातशाळा
राया, माझं नाव तुम्ही शाळेमंधी घाला ।।धृ।।
शिक्षणाची राया आम्हा नव्हती काही गोडी
लोक वेडे म्हणती कशी अडाण्याची जोडी
घरी नाही कोणी आता राया हिशोबाला
राया, माझं नाव तुम्ही शाळेमंधी घाला ।।1।।
अडाणी होते म्हणून तुमच्याशी लगीन केलं
पोरं झाली सात तरी काय माझं भलं केलं
डोळे असूनी आंधळी मी भिडले या संसाराला
राया, माझं नाव तुम्ही शाळेमंधी घाला ।।2।।
शेजारीनी कशा जाती नटून थटून शाळेला
सांभाळा ही पोरं सारी पुरवा माझ्या हौसेला
कारभारीन लाडकी मी जाऊ द्या हो वैद्यकीला
राया, माझं नाव तुम्ही शाळेमंधी घाला ।।3।।
इंदिराबाई भारताच्या झाल्या पंतप्रधान
तेव्हापासून देशात प्रौढ शिक्षणाला मान
झाले गेले विसरुनी किंमत देऊ शिकण्याला
राया, माझं नाव तुम्ही शाळेमंधी घाला ।।4।।

प्रिया निळे
बी.कॉम. तृतीय

## प्रगतीचे दार

सूर्य जसा ढगा ढगातून हसवितो
भिवापूर महाविद्यालय तसे मनामनाला फुलविते
जसा पाऊस करतो चिंब ओला
मन जुळवितो महाविद्यालयाच्या वाटा
शिक्षणाने शिक्षण करीतो मनाचे नाते
विद्यार्थ्यांना घडवितो पुस्तकाच्या साथीने
अफाट ज्ञान देईल, देत राहतील
महाविद्यालयाच्या गुणांचं गुणा
भिवापूर महाविद्यालयाच्या प्रगतीचे दार
शिक्षक घडवितो सोन्या–चांदीचे हार ...

तानाजी ठवरे
बी.ए. द्वितीय

## जीवनाच्या वाटेवर

जीवनाच्या वाटेवर चालतांना
असे रडायचे नसते
काटा पायात रुतला तरी
दु:ख दाखवायचे नसते.
उरी वेदना होत असल्या तरी
सदा हसायचे असते
फुल बनता आले नाही तरी
काटा बनायचे नसते.
जीवन आनंदी करण्यासाठी
मैत्रीचे धागे गुंफावे लागती.
हे सगळं जीवनाच्या वाटेवर करायचे असते.


सुभाष बडनाग
बी.ए. द्वितीय

## पैसा



काळ बदलला, वेळ बदलली, रंग बदलले, रिती बदलली
मने बदलली, वेश बदलले, तऱ्हा बदलल्या, निती बदलली
दुनिया हळूहळू एक बाजार बनत चालली आहे
व्यापाऱ्यांचा, दलालांचा धंदा जोरात सुरु आहे.
खरेदी, विक्री, नफा, तोटा या शब्दांना भाव आला आहे
आधुनिक या बाजारपेठेत जो तो ग्राहक झाला आहे
अन् एकाएकी पैशाला बरीच किंमत आली आहे
सबसे बडा रुपया! अशी म्हणच तयार झाली आहे.
नाते–निती, यारी–दोस्ती, माया, ममता आणि प्रिती
पैशाची दादागिरी दाखवा, सगळे मागे धावत येती ।
याचा भाव इतका, त्याचा भाव तितका
अशीच भाषा ऐकू येतेय
आज नगदी, उद्या उधार, माल पाहून कारभार
अशीच वाणी कानी पडतेय.
दलालांची फिरती गाडी कुठेतरी वाट चुकली आहे
'पैसा बोलता' – अशी आरोळी मी ही ऐकली आहे.

प्रफुल धनविजय
बी.कॉम. तृतीय











## खोटेपणाची शिक्षा

देवाने ठरवले एकदा, पक्ष्यांना रंग द्यायचा
सांगितले कावळ्याला, पक्षी सारे बोलवायचे
कावळ्याने छोट्या पक्ष्यांना देवाचा निरोप दिला
जो तो रंग मिळणार म्हणून आनंदून गेला.
देवापुढे सारे पक्षी झाले पटापट गोळा
देव म्हणाला कावळोबा, जमला का सर्वांचा मेळा
आवडीनुसार पक्ष्यांना रंग देणे झाले सुरु
रंगारी म्हणाला मोर दिसत नाही हो गुरु
कावळ्याच्या मनात विचार आला काळा
एवढ्या मोठ्या मोराला बोलवायचं टाळा
देव म्हणे कावळ्याला शिक्षा रंग द्या काळा
मोराला बोलावून रंग द्या, सर्वांपेक्षा निराळा.

स्मिता सातपूते
बी. ए. द्वितीय

## स्वभाव



घरटे उडते वादळात
बिळा, वारुळात पाणी शिरते
कोणती मुंगी, कोणतं पाखरु
म्हणून आत्महत्या करते ?
प्रतिकूल परिस्थितीत हो वाघ
लाचारीने जगत नाही
शिकार मिळाली नाही म्हणून
आधीच अनुदान मागत नाही.
घरकुलासाठी मुंगी
करत नाही अर्ज
स्वतःच उभारते वारुळ
कोण देतो गृहकर्ज.
हात नाहीत सुगरणीला
फक्त चोच घेऊन जगते
स्वतःच विणते घरटे छान
कोणतं पॅकेज मागते ?
कुणीही नाही पाठी
तरी तक्रार नाही ओठी
निवेदन घेऊन चिमणी
फिरते का कोणत्या योजनेसाठी.
घरधन्याच्या संरक्षणाला
धावुन येतो कुत्रा
लाईफ इन्शुरन्स काढला कां
असं विचारत नाही मित्रा।







सोनल ढोणे
बी. कॉम. तृतीय

## देश आमचा



आमचा देश महान आहे
संस्कृती इथली महान आहे
कसायाच्या सुरीखाली
गरीब गाईची मान आहे.
आमच्या महान देशात
हिंदुत्वाचे कट्टर कैवारी आहेत
देवदेवतांचे पुजारी आहेत
अन् बायकोचे बळी घेणारे
इथे शिकारी पण आहे.
आमच्या या महान देशात
व्यसनाचे पिडीत आजारी आहेत
गरीबांची बेकारी आहे
अन् शेतकरी कर्जबाजारी आहे.
आमच्या महान देशात
कितीतरी वेठबिगारी आहेत
हीतचिंतकाचा आव आणून
घरात सुरुंग पेरणारे
इथे शेजारी पण आहेत.
आमच्या या महान देशात
घरची कचऱ्या समान आहे
बाहेरवालीला मान आहे.
माय मराठी झाली बिचारी
घरोघरी मम्मी–पापा राज करी.

प्रिया निळे
बी.कॉम. तृतीय

## महाराष्ट्र भूषण



ह्या भारताच्या सिमेवर वीर असे उतरले
हे महाराष्ट्र भूषण आपले हे महाराष्ट्र भूषण आपले ।।
स्त्रियांमधील एक अशी ही मायेच्या सागरासारखी
प्रेम करणारी अनाथांची माई 'सिंधुताई'
मुलींसाठी, अनाथांसाठी, अपंगांसाठी स्वतःच्या प्राणाची
आहुती स्विकारणारी अशी ही
अनाथांची माई 'सिंधुताई'
चितेच्या अग्नीवरील भाकर भाजून खाऊन भूक भागविणारी
अनाथांची माई 'सिंधुताई सपकाळ'
हे महाराष्ट्र भूषण आपले हे महाराष्ट्र भूषण आपले ।।



पद्मविभूषण खेलरत्न सर्वोच्च नागरी असा भारतरत्न
विश्वविजेता सचिन तेंडूलकर
निर्धाराने पुढे जाणारे संकटांचा सामना करणारे
प्रगतीचा शिखर गाठणारे
असे हे खेलरत्न सचिन तेंडूलकर
विख्यात जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानले जाणारे
असे हे माजी भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर
एका वर्षात 1000 धावा करण्याचा हा पराक्रम
6 वेळा करणारे असे हे सचिन तेंडूलकर
हे महाराष्ट्र भूषण आपले हे महाराष्ट्र भूषण आपले ।।



गरीब, अंधांसाठी, मूक बधिरांसाठी अशा अनेक अपंगांसाठी
जिवापाड प्रेम करणारे, त्यांच्या सुप्त गुणांना चालना देणारे
असे हे आपले बाबा आमटे
अज्ञान, अंधश्रद्धा दूर करणारे, आदिवासींचा विकास करणारे
हे महाराष्ट्र भूषण आपले हे महाराष्ट्र भूषण आपले ।।



स्त्रियांमधील एक अशी ही गान कोकीळा लता दीदी
दिव्याच्या पेटण्याला जशी तेलाची गरज
तशी लता दीदींच्या गाण्यांना आत्मविश्वासाची गरज
अडी, अडचणी दूर करी, मनापासून कार्य करी
अशी सर्वांची आवडती गाणसम्राज्ञी लता दीदी
हे महाराष्ट्र भूषण आपले हे महाराष्ट्र भूषण आपले ।।

नम्रता वाघमारे
बी.ए. प्रथम



## ज्ञान

भात नको गुरुजी मला ज्ञान पाहिजे
मायाकडं गुरुजी तुमचा ध्यान पाहिजे.
बाप म्हणे मले तुले खायले कमी नाय
सांग गुरुजीले दयाया जे मायाकडं नाय
माया हुशारीले जगी स्थान पाहिजे
भात नको गुरुजी मला ज्ञान पाहिजे
कागदामंदी झुकलेली तुमची
मान वर पाहिजे
भात नको गुरुजी मला ज्ञान पाहिजे
शाळत नाय त्याची तुमा मोप चिंता
माया भविष्याची काऊन रचते चिता
मायासाठी रडणारं तुमचं मन पाहिजे
भात नको गुरुजी मला ज्ञान पाहिजे
डोक्यामंदी सादिल खर्च इन्कम टॅक्स चा मार्च
तुमा शाळेत शोधाया पायजे मला टॉर्च
तुमच्यागत आमाले भी थोडा मान पाहिजे
भात नको गुरुजी मला ज्ञान पाहिजे
रंग्या शाळत येत नाय तरीबी वरच्या इयत्तेत जाय
कोरी पाटी घेऊन कोणी बॅरिस्टर होणार नाय
कागदावर नको मायात गुण पाहिजे
मायाकडं गुरुजी तुमचा ध्यान पाहिजे.

श्रीकांत भोगे
बी.कॉम. तृतीय

## भाग्यवान

मी देवाजवळ शक्ती मागितली
यशस्वी होण्यासाठी
देवाने मला शक्तीहिन केलं
मी नम्रतेने आज्ञापालन करायला शिकावं म्हणून.

मी चांगलं आरोग्य मागितलं
काही भव्य दिव्य करण्यासाठी
त्याने मला दुबळं केलं
मी काही चांगल्या गोष्टी कराव्यात म्हणून.

मी देवाजवळ ऐश्वर्य मागितलं
सुखी होण्यासाठी
देवाने मला दारिद्र्य दिलं मी शहाणं होण्यासाठी

मी जे मागितलं ते नाही पण
शिकण्यासाठी सर्वच गोष्टी मला मिळाल्या

मनापासून जे मी मागत होते
ते मला माझ्या नकळत मिळत गेले.
आणि सर्वांपेक्षा खरे भाग्यवान
मीच ठरले.

अलका नांदेकर
बी. ए. प्रथम

# विवेकवाणी



परमेश्वर नेहमी कृपाळूच असतो. जो अत्यंत शुद्ध अंतःकरणाने त्याची मदत मागतो त्याला ती निश्चितपणे मिळत असते.

देशातील दारिद्र्य व अज्ञान घालविणे म्हणजे ईश्वराची सेवा आहे.

संकटाची अभेद्य भिंत उभी राहिली तरी ती भेदून जाणून मार्ग काढणारे चारित्र्यच असते.

भविष्यकाळाची चिंता करण्याचे सोडून दया. त्यामुळे कोणतेही कार्य सिद्ध होत नाही. चिंता करायची असेल तर आपल्या चारित्र्याची करा.

दयाशील अंतःकरण म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गच होय.

आध्यात्मिक ज्ञानाचे दान हे सर्वश्रेष्ठ दान होय.

दुःखी माणसाला मदत करण्यासाठी लांबवलेला एक हात प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त.

डोक्यावर जणू दुःखाचा मुकुट चढवून सुख मनुष्यापुढे उभे राहते. जो सुखाचे स्वागत करतो त्याने दुःखाचेही स्वागत केलेच पाहिजे.

बाह्य जगाचे ज्ञान करुन घेतल्याने धर्मज्ञानाची प्राप्ती होऊ शकत नाही. परंतु तुमच्या अंतर्मनाला, अंतःकरणाला जाणून घेतल्याने तो होत असते.




धर्म म्हणजे मानवी अंतःकरणाच्या विकासाचे फळ आहे. वास्तव धर्माचा प्रमाणभूत आधारपुस्तक नसून मानवी अंतःकरण आहे.

मनाची एकाग्रता ही जनसाधनेची गुरुकिल्ली आहे.

ध्येयासाठी जगणे हे ध्येयासाठी मरण्यापेक्षाही कठीण आहे.

कार्यशक्ती आणि इच्छाशक्ती प्राप्त करा, खडतर परिश्रम करा म्हणजे तुम्ही निश्चित ध्येयाप्रत पोहोचू शकाल.

<u>बाबांचा मला कळलेला अर्थ</u>

बाबा म्हणजे अपरिमित कष्ट करणारं शरीर. बाबा म्हणजे अपरिमित काळजी करणारं मन. स्वतःच्या इच्छा आकांक्षा बाजूला ठेऊन मुलासाठी झटणारं अंतःकरण.

संकलन
रश्मी वारकर
बी.ए. द्वितीय

## मराठी अस्मितेसाठी






'गर्जा महाराष्ट्र' शिवाय
आम्ही दुसरे काही गात नाही.
मराठी चित्रपट बघायलाही
आजकाल कुणी जात नाही.
मराठी अस्मिता सोडून
इतर बरेच सोस आहेत
मराठीच्या प्रेमाशिवाय
मनाचे कोपरे ओस आहेत.
मराठी बोलत नाहीत
मराठी वाचत नाहीत
घोषणा बाजी आणि राड्यांशिवाय
अस्मितेला मार्ग सुचत नाही.
परक्यांना दोष देतांना
थोडे आतमध्येही झाकु या.
उंच उंच जायचे तर
खेकडेशाही टाकु या.

पुजा सेलोरे
बी.ए. द्वितीय

## जीवनातील आठवण

तुझी आठवण ना तु ना मी
ना आपण काहीच नाही राहिले
भूतकाळात सारे असेच घडून गेले
राग होते, रुसवे होते, सारेच काही फसवे होते
माझ्या फजितीवर सारेजण हसले होते
भविष्य काळातील स्वप्न सारी
उध्वस्त होत चालली आहेत
एकामागून एक असं विचित्र घडत आहे.
कधी असं झालं तर स्वतःला मी सावरत असतो
आपल्या बरोबर कुणीच नाही
म्हणून मन ही रडत असतं.
अश्रूही थांबत नाहीत
ते वाट मोकळी करतात
स्वतःचे दुःख ते
माझ्या नेत्रातून सांडतात.
एवढं मात्र खरं
ते फक्त तुझीच आठवण काढतात.

अमीत मेश्राम
बी.ए. तृतीय



## आदर्श जीवन

चूक झाली तर मान्य करा.
दुसऱ्या व्यक्तीचे मत विचारात घ्या.
नेहमी चांगल्या कामाची स्तुती करा.
दुसऱ्यांचे आभार मानायला कधीच विसरु नका.
'मी' ऐवजी 'आपण' शब्द प्रयोग करा.
सदा हसतमुख राहा.
दुसऱ्यातले चांगले गुण ओळखा व आत्मसात करा.
दुसऱ्याच्या व्यंगावर हसू नका.
टीका, तक्रार व बहिष्कार यामध्ये वेळ वाया घालवू नका.
दुसऱ्यांच्या खांद्यावर स्वतःचे अपयश लादू नका.
अंतरी मैत्री भावना जागू द्या.
क्रोधावर नियंत्रण ठेवा.
सत्याला चिकटून राहा.
इतरांना चांगली वागणूक द्या.
सुखाचा गुणाकार व दुःखाचा भागाकार करा.
नेहमी विचार करुन बोला.

माधुरी सुरईकर
बी.ए. तृतीय




## जीवनाचे गणित

सौंदर्य व सुख यांची बेरीज करा
मैत्रीतून मत्सर वजा करा
प्रेमाला शुद्ध अंतःकरणाने गुणा
लघुत्तर काढा.
सुविचाराचा आणि सदाचाराचा वर्ग करा.
शरीर व आत्मा यांचा भागाकार करा
दया, क्षमा, शांती यांचे स्पष्टीकरण सोडवा.
हेच सुखी जीवनाचे गणित.

अश्विनी वाघमारे
बी.ए. प्रथम

## डोळे



सगळ्यात सुंदर नाते हे
दोन डोळ्यांचे असते
ते एकाच वेळी उघडझाप करतात
एकाचवेळी रडतात
एकाचवेळी झोपतात
ते ही आयुष्यभर
एकमेकांना न बघता ......

स्मिता सातपुते
बी. ए. द्वितीय

## वात्सल्य



जे जोडलं ते नाते
जी जडते ती सवय
जी थांबते ती ओढ
जे वाढते ते प्रेम
जो संपतो तो सहवास
आणि निरंतर राहतात
त्या फक्त आठवणी.

आई असते तेथे चैतन्य नांदते
तिच्याविणा घर आंगण
सुने–सुने वाटते
देऊनी संस्कार तीच घडविते
कधी होऊन कठोर तीच रडविते
तीच कुशीत घेऊत माया करते
तुमची असो वा माझी असो
आई शेवटी आईच असते.



पंख नाहीत मला पण
उडण्याचे स्वप्नं मात्र जरुर बघतो
कठीण असलं आयुष्य तरी
भरभरुन जगतो
जोडली नाहीत जास्त नाती
पण आहेत ती मनापासून जपतो
आपल्या माणसांवर मात्र
मी स्वतःपेक्षा जास्तं प्रेम करतो.

प्रिया निळे
बी. कॉम. तृतीय

## हवा

अरे देवा नको ही हवा
ज्यात आहे प्रदूषणाचा थवा
फक्त ऑक्सिजन मागतो आम्ही
उरलं जीवन जगण्यासाठी।
अरे देवा ही हवा
आमच्या जीवनाचा लागे हवा
असा लाव शोध नवा
ज्यात राहील शुद्ध हवा।
अरे देवा ही हवा
आहे जीवन आमचा जवा
मग दुषित का होते हवा।
अरे देवा ही हवा
हेवा वाटे मला नवा
कर शुद्ध हवा जगू दे प्राणी मात्राला।


मोनाली काळे
बी. ए. प्रथम

## [illegible]

[illegible] सहवास
[illegible] आयुष्यभराची मैत्री
[illegible] पाऊस
[illegible] छत्री
[illegible]
[illegible] आई
[illegible] तिच्या
[illegible] खुळा होई
[illegible] कामधुकार
[illegible] अंधश्रद्धेचा आधार
[illegible] बांधल्याने म्हणे
[illegible] जाई आजार
[illegible] आता पोटाशिवाय
[illegible]तून फिरते
[illegible] ताट रिकामे
[illegible] मन म्हणते.

मयुरी वैरागडे
बी.ए. तृतीय






## आँसु


तरंगले पाणी जे तुझ्या डोळ्यांत
उतरवून ठेवले आहे ते मी माझ्या ह्रदयात
अनेक अर्थ होते त्या अश्रुंना
पण काही नाही म्हणून तू
सावरलेस स्वतःला
तेव्हाच आले माझ्या ध्यानात
विरह भिजून पाहत होता
त्या आसमात
पण मात्र एक लक्षात ठेव
तुझ्या ह्या आसवांचे मोती
जपून ठेवले आहे मी
कायमचे माझ्या काळजात
प्रतिक्षेत तुझ्याच...

सौरभ धनविजय
बी.ए. प्रथम

## पर्यावरण




वृक्षांना माणसं हवी असतात
त्यांच्या स्पर्शासाठी आसुसलेली असतात
रात्र–दिवस, उन्हापावसात सावली धरतात
प्राणवायू चोवीस तास बारा महिने सोडतात
झाडांची भाषा, व्यथा कळली असती
वृक्षांची तोडमोड केली नसती
कुठे हरवली ती मानवी वस्ती
जी झाडं होऊन जगली
लता–वृक्ष आम्हा सगे–सोयरे
झाडांशिवाय जगताच येत नाही
झाडा सोबत पक्षी, मुलं गाणी गातात
आपल्या जगण्याचं वृंदावन करतात
आपण जन्मास घातले नाही
म्हणूनच कापतांना हात थरथरत नाही
आपली ह्रदय दगडाची झालीत
पर्यावरण बिघडविले काय साधले
वृक्षतोड थांबवा, पर्यावरण वाचवा.



## निसर्ग

निसर्गासारखा नाही रे सोयरा गुरु सखा बंधू मायबाप
त्याच्या कुशीमध्ये सारे व्यापता मिटती क्षणात आपोआप
त्याच्या संगतीत फिटतो संदेह वितळतो क्षोभ माया मोह
त्याच्या संकीर्तनी मुरविता देह भेटतो उजेड अंतर्बाह्य
त्याच्या स्मरणाने प्रकाशते मन उजळते जग क्षणकाली
स्थिरावते पुन्हा चळलेले वित्त पुन्हा मूळ वाट पायाखाली.

देवकन्या बान्ते
बी. ए. द्वितीय

## दिवस

भगवा सूर्य कधीही स्वतःला
हिंदू म्हणवून घेत नाही
हिरवा निसर्ग कधीही स्वतःला
इस्लामवा म्हणवून घेत नाही
निळे आकाश कधीही स्वतःला
बौद्ध म्हणवून घेत नाही
मात्र सर्व रंग मिळून सृष्टीला
सुंदर बनवतात.
म्हणूनच सर्वांनी
जात, धर्म, वर्ण, लिंग, वंश, देश, राज्य
यांचा भेद न करता
एकत्र राहून मानवी जीवन
सुंदर व उदात्त बनवू या.
आपला दिवस आनंदात जावो.

संगिता खवास
बी. कॉम. प्रथम

## [illegible]

प्राचीन काळापासून मानव आणि निसर्गाचा एक अतूट संबंध आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या गरजा वृक्षामुळेच सुटल्या. वृक्षापासून गोड फळे मिळाली, त्यांच्या साली, पानांपासून घालण्यासाठी कपडे तयार झाली, त्यांची लाकडे आणि पाने यापासून घरे तयार बनले. प्राचीन काळातील साहित्य पण भूर्जपत्रावर लिहिले गेले होते. आजही सुरक्षित आहे. वृक्ष ही निसर्गाची सर्वात श्रेष्ठ देणगी होय. वृक्षाच्या हिरवळी शिवाय मानवी जीवनाची कल्पना करणे व्यर्थ आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत लाकडे आपल्या कामी येतात. बालपणी लाकडी पाळण्यात झोपणे, म्हातारपणी काठीचा आधार घेऊन चालणे, आयुष्य संपल्यावर लाकडाच्या चितेवर झोपणे हीच मनुष्याची अंतिम गती आहे. वृक्षापासून आपणांस शुद्ध प्राणवायू मिळतो. दाट, हिरवे जंगल पाहून मन प्रफुल्लित होते.

वृक्ष स्वतः उन्हात राहून आपणांस सावली देतात. जोपर्यंत हिरवे असतात तोपर्यंत आपणांस हिरवी पाने, फळे, भाज्या देतात. याच वृक्षांची हिरवी पाने, फळे खाऊन गाई, म्हशी, शेळया आपणांस दूध देतात. त्यातून आपणांस प्रथिने मिळतात. हीच वने पृथ्वीला नापीक होण्यापासून वाचवितात. भू-स्खलन आणि पर्वत स्खलन होऊ देत नाही. आपल्या हिरवेगार पणामुळे पर्यटकांना आपल्याकडे आकर्षून घेतात आणि देशाच्या प्रगतीस हातभार लावतात.

सुनंदा घुमे
बी.ए. प्रथम

## बाप



जीवनरुपी संसाराच्या रथाला दोन चाके असतात. ती दोन चाके म्हणजेच आई वडील. जे काही कर्तव्य संसारात त्यांचे असते ते दोघेही मिळून पूर्ण करतात. पण त्याचे सर्व श्रेय आईलाच दिले जाते. देवी देवतांनी, संत महात्म्यांनी सुद्धा आईचेच गुणगान गायलेले आहे. बाप तर कुठे आठवतच नाही. बाप हा पडद्याआड असतो. त्यामुळे त्याचे मोल कोणाला कळत नाही.

सर्वांना लहान संकटाच्या वेळी आई आठवते. मोठ्या संकटाच्या वेळी आपल्या तोंडून बाप रे म्हणून आवाज निघतो. त्या ठिकाणी बापाशिवाय काम भागत नाही. संपूर्ण संसाराचा गाडा त्याच्या खांद्यावर असतो. आपल्या मुलांना दोन वेळचे पोटभर अन्नं मिळावे म्हणून तो रखरखत्या उन्हात सूर्यासारखा तापत घाम गाळत असतो. एखादे संकट येता आई रडून आपले दुःख व्यक्त करते पण बाप रडू शकत नाही. तो उशीखाली मान घालून आपले दुःख लपवितो.

स्वतः फाटके कपडे घालून मुलाला नवीन कपडे घेऊन देणारा बाप असतो. मुलीच्या लग्नासाठी धाव्वा लागणाऱ्या पैशासाठी एक एक पैसा जमा करणारा बाप असतो. जीवनाच्या प्रत्येक वळणावर बोट धरुन योग्य मार्ग दाखवणारा बाप असतो. लहानाचे मोठे करुन आपल्याला सक्षम बनविणारा बाप असतो. स्वतः काटेरी वनातून चालून आपल्याला जपणाऱ्या त्या बापाला उतारवयात नाकारु नका. ज्याने तुम्हाला घडविले त्या बापाच्या म्हातारपणाची काठी तुम्ही बना.

मयुरी चौधरी
बी.ए. द्वितीय

## मैत्री आणि प्रेम

आयुष्यात आपणांस कोणाची तरी साथ हवी असते. कधी मैत्री हवी असते तर कधी प्रेम हवे असते. प्रेमाची साथ कधीही तुटते. पण मैत्रीची साथ अतूट असते. मैत्री ही प्रेमाची अनमोल साखळी असते. मैत्रीत विश्वास असतो.

कारण त्यात दोन श्वास गुंतलेले असतात. मैत्री निभवावी तर ती शेवटच्या श्वासापर्यंत. त्यालाच खरी मैत्री म्हणतात. मैत्री व प्रेमामध्ये फरक असतो. प्रेमामध्ये ज्याप्रमाणे एखादयाचा मोह वाटतो. त्याप्रमाणे मैत्रीमध्ये वाटत नसते. मैत्री ही काही काळापर्यंत मर्यादित असते. मैत्री मध्ये कधीही भेदभाव, द्वेष, अहंकार, स्वार्थ नसतो. जीवनात प्रत्येक संकटाच्या वेळी धावून येणारे खरे मित्र मैत्रिणी असतात. जीवनात पावलोपावली साथ देणारे आत्मविश्वासाची नाती ही खरी मैत्री असते. मैत्री असावी अशी ती घासातून घास देणारी. मैत्रीमध्ये कार्य असे असावे जे मरतानाही आठवणीत असावे. मैत्रीत कधीही तुझं नि माझं नसते. ती निःस्वार्थ असते. प्रेम हे पांढऱ्या शुभ्र कपड्याप्रमाणे असते. पांढऱ्या कपड्यांवर डाग लागला की तो कधीही मिटत नसतो. तसेच प्रेमाचे असते. प्रेम हे आई, वडील, आजी, आजोबा, बहीण, भाऊ, पती पत्नी अशा अनेक नातेवाईकांवर होत असते. जीवनामध्ये प्रेम हे एकदाच होत असते. ते मनापासून करायचे असते. प्रेम हे दोन आत्म्यांना एक करत असते. प्रेम हे जबरदस्तीने कधीच होत नसते. तेथे प्राणाची पर्वाही नसते. खऱ्या प्रेमामध्ये जीवनाचे स्वार्थ नसते. प्रेम तुटल्यावर खूप वेदना होत असते. मैत्री तुटल्यावर तेवढ्या वेदना होत नसते. मैत्री जर अतूट असेल आणि तिचा प्रेमात बदल झाल्यास ती तुटल्यावर वेदना होत असते. जगण्याची इच्छा नाहिशी होते. मित्र मैत्रिणी दूर जातात. तेव्हा मन खूप दुःखी होते. अशी ही मैत्री अतूट असते.

नम्रता वाघमारे
बी.ए. प्रथम



## विद्यार्थी कसा असावा ?

शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रत्येकाच्या मनात एक ध्येय असते. कोणी वकील, तर कोणी डॉक्टर होण्यासाठी तर कोणी सरकारी नौकरी करण्यासाठी शिकत असतो. शिकून पैसा कमवता येईल हे उद्दिष्ट्य समोर ठेवून शिकणे सुरु असते. विद्यार्थ्यांमध्ये हे उद्दिष्ट्य इतके तीव्र असते की जीवन चैनीच्या मनात पाल पेरायचं काम करतात.

आपल्या कुटुंबाला मदत करणे हे त्याचे ध्येय असते. परंतु जगातल्या इतर दुर्बल घटकांना मदत करणे पालक शिकवतील का ? श्रीमंतीत राहून चैन करणे ही बाब विद्यार्थ्यांसाठी नव्हे तर मानवतेसाठी एक लाजिरवाणी गोष्ट आहे. चैनीने जीवनाची इच्छा ही सामान्य लोकांच्या विशेषतः विद्यार्थ्यांच्या प्रगतीत अडथळा आणते म्हणतात. "जीवनाचे रान केल्याशिवाय यशाची बाग फुलत नाही."

वर्तमान अवस्थेत स्वतःमधील गुणांचा विकास करुन समाजसेवेसाठी किंवा देशसेवेसाठी समोर येईल का ? प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःला कधी प्रश्न विचारला का ? मी कशासाठी जन्म घेतला, शिकून मला काय करायचे आहे, असा विद्यार्थी विद्यार्थीदशेत असतांना त्याच्या मनात जनजागृतीचे विचार उमलतील का ? भूतकाळात जे थोर समाजसेवक किंवा देशसेवक होऊन गेले त्यांनी समाजासाठी कोणते कार्य केले हे या वर्तमान अवस्थेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना पटेल का ? जगातील चांगलं, वाईट याचा विचार किंवा बुद्धी सामर्थ्य ज्ञान आणि सुंदरता व उच्च कल्पनांचा उपयोग करुन जग कल्याणासाठी ते पुढे येतील का ? किंवा धैर्याने कृतीशील राहून ते आपल्या जीवनात यशस्वी होतील का ?

मोनाली उरकुडे
बी.ए. द्वितीय


# पर्यावरण समृद्धीची नवी पहाट

उपनिषदामध्ये झाडाच्या बी ला मानवी जनुकाची उपमा दिली आहे. झाडाचे बी आणि मानवी जनुकं सारखेच. बी जमिनीत पुरल्यावर पावसाच्या थेंबामुळे ते अंकुरते, रोपटं होते. कालांतराने मोठं झाड तयार होते ते केवळ झाड नसते तर ते पशु पक्षी, किडे, किटकांचे एक गांव असते. ते जीवनभर उन्हा तान्हात एकाच ठिकाणी उभे राहून सजीव सृष्टीला सतत देण्याचे काम करते. झाड जीवनभर काहीही न मागता केवळ देण्याचच काम करतात. तर मानव केवळ घेण्याचच काम करतो. घेता घेता आयुष्य गमावतो आणि देण्याचे पवित्र कार्यच विसरून जातो. पर्यावरण समृद्धीचा एकच आरा. एक बी मातीत पेरा, ते वाढवा, रक्षण करा, निसर्ग हाच गुरु खरा, सुखी जीवनाचा मंत्र बरा. सूर्योदयाची कोवळी किरणे सकाळ माझ्या घराच्या परसात पाखरांचा किलबिलाट घेऊन येतात. त्यातूनच मी झोपेतून जागा होतो. आणि माझी दिवसाची सुरु होते. पिटू पिटू आवाज करत बुलबुल येतात. त्यातूनच मी झोपेतून उठतो. मैना एकमेकांच्या चोचीला चोच लावून माणसाला न समजणारा संवाद साधत असतात. चिऊताईचा चिवचिवाट, कावळ्यांची कावकाव, कोकीळ नराचे कुहू कुहू गायन, सातभाईंचा न समजणारा गोंगाट. आणि या सर्वांमध्ये लक्ष वेधून घेते ती सुभग पक्ष्यांची सुंदरशी शीळ. त्याचबरोबर कोतवाल, दयाळ, होले, टिटवी, सूर्यपक्षी इ. पाखरांचा स्वरांचा मेळ बसतो. आणि परसात सारं चैतन्य पसरते. वैशाखी उन्हे रखरखायला लागली की आमच्या कडील बहावा सोनपिवळया फुलांनी नखशिखान्त ठवरतो. सकाळ पहाटे पुर्वेकडून येणाऱ्या सूर्यकिरणात तो अधिकच तेजाळून निघतो. सोन्यापेक्षाही जास्त झळाळी त्यावर दिसून येते. काळे मधुकर भुंगे त्यावर मध मिळविण्यासाठी भुगगू, भुगगू करत फुलाफुलांतून उडत असतात. मध्येच निळ्या–सोनेरी रंगाचे लांब टोकदार चोचीचे सूर्यपक्षी बटावावर येऊन गोंधळ घालत झाडांच्या फांदीफांदीतून गिरक्या घेत फिरतात. बारमाही आंबा, पेरु, अशोक वृक्षाला पाखरांच्या आवाजाला कंठ फुटतो. जांभळाच्या झाडावर मैना, पोपट, बुलबुल, कोकिळेसह कधी कधी राखी बगळा शेंड्यावर बसून खालील भक्ष्याकडे लक्ष ठेवून असतो. तर कोराटा, गुलाब, जास्वंद, जाई–जुई, चमेली इ. लहान सहान फुलझाडांवर राखी वटवट्या, सूर्यपक्षी, शिंपी इ. पक्षीगण मध, किडे–किटके टिपण्यात गुंग झालेले असतात.

आमच्या घरातील स्वयंपाक ओटयाच्या खिडकी पलिकडे सात आठ फुटावर पाच फुट भिंत असून त्यावर सकाळ संध्याकाळ पक्ष्यांच्या येरझरा सुरु असतात. त्या भिंतीवर एका ठिकाणी कुटुंबातील सदस्यांनी खाल्लेली पपई, अंजूर, डाळींब, जांभूळ, पेरु, संत्रा, आंबा इ. अर्धवट फळे आम्ही ठेवतो. त्याच्या बाजूलाच एका लहानशा गाडग्यात पाणी ठेवण्यात येते. सकाळी–सकाळी येथे तर रंगीबेरंगी पक्ष्यांचा मेळाच भरतो. निसर्ग देवतेने सृष्टीत मुक्तपणे रंगाची उधळण केली असेल तर ती पक्ष्यांवर.

पहाट झाली की वरच्या विजेच्या तारांवर मैना, बुलबुल, चिऊताई, मुनिया, कोकीळ, खाटीक, कोतवाल, साळुंकी, मैना इ. पक्षी जमतात. यात सर्वात अगोदर खारुताई क्षणाक्षणाला परिस्थितीचा आढावा घेऊन खाली उतरतात. चिकचिक आहे का तर माणसाच्या ठायी ठायी स्वार्थ दडला असतो.

परसातील लहान मोठ्या वृक्षलतांमुळे पाखरांची उपस्थिती सतत असतेच. त्यामुळे किड्या किटकांचे प्रमाण अतिशय नियंत्रणात राहते. साप, गोम, विंचू फार कमी दिसतात. किंवा आपणांस दिसण्यापूर्वीच पाखरांच्या ते दृष्टीस पडून त्यांचा फडशा पाडतात. त्यामुळे कधीही, कुठल्याही रासायनिक पावडर किंवा स्प्रे चा उपयोग करावा



लागत नाही. पक्षी मानवी जीवन सुसह्य करीत असतात. पक्ष्यांना अन्न, राहण्यासाठी इवलासा निवारा व सुरक्षितता मिळाली की तेच तुमचं रक्षण करतात. आपल्या कुळाची वाढही करतात. त्याचबरोबर खाल्लेल्या फळातील बिया आपल्या विष्ठेवाटे जमिनीवर टाकतात. पावसाळ्यात त्याची रोप अंकुरतात व कालांतराने झाडे ही तयार होतात. जी शुद्ध ऑक्सिजन देण्याचे काम जीवनभर मोफत करत असतात. परिसराला निरोगी ठेवण्यासाठी शेतातील पिकांवर पडणाऱ्या किडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पक्ष्यांची उपयुक्तता अत्यंत आवश्यक आहे. उंदीर, घुशींवर हे पक्षी नियंत्रण ठेवतात. मृत पावलेले किडे–किटकं खाऊन टाकतात. पर्यावरण संतुलनासाठी किती महत्वाचे योगदान हे पक्षी देत असतात, माणूस हे कधी शिकणार ? पर्यावरण संतुलनाची जबाबदारी केवळ पशु पक्ष्यांचीच आहे ? सुर्यास्तानंतर अंधार दाटू लागला की ठिपकेवाले आवाज करत आपली झुपकेदार शेपटी फुलवत तेथे ठेवलेल्या फळांवर, अन्नावर ताव मारतात. भाताचा एक शीत पुढील दोन पायांच्या बोटात पकडून उडून जातात. काही पक्षी थेट आपल्या घरट्यात पोहोचतात. लहान पिल्लांना खाऊ घालतात. परत परत एका नव्या आशेने त्यांच्या येरझारा सुरु असतात. परंतु पोटाला पाहिजे तेवढच अन्नं ते मिळवितात. माणसासारखे अधाशासारखे खात बसत नाहीत. किंवा त्याचा साठाही करत बसत नाहीत. पक्ष्यांना कशाची काळजी नसते. एवढ्यात कोकीळी नर–मादी येतात. त्यामुळे तेथे ताव मारत बसलेले लहान पक्षी भीतीने भुर्रकन उडून जातात. पक्ष्यांमध्ये इतर लहान पक्षी मोठ्या विशिष्ट पक्ष्यांचा भीतीयुक्त आदर करतात, कारण त्यांना शरीराप्रमाणे खाद्यही जास्त लागते. त्यातही कधी कधी भूक लागलेले बुलबुल मैना धारिष्ट्य करुन तेथे पोहोचतात. व काही कण मिळविण्याचा प्रयत्न करतात. एखादया प्रसंगी तेथे मग सातबाया, चिमण्या, बुलबुल, कोकीळ इ. पक्ष्यांची गर्दी होते. परंतु एकमेकांवर कधी ते हल्ले करत नाहीत. एकमेकांच्या हातातील चोचीतील पदार्थ हिसकत नाही. बिचारे आपआपले पोट भरुन उडून जातात. कधी कधी काव काव करत कावळेही येतात. चोचीत जमले तेवढे घेतात आणि तारावर बसून खातात, निघून जातात. पक्ष्यांमध्ये आतताईपणा दिसून येत नाही. माणसाचे मात्र याविरुद्ध. घुबड (मटमट्या) सक्रिय होतात. तारावर बसून च्युक च्युक चुकाट आवाज करतात. त्यातून ते एकमेकांच्या अस्तित्वाची, भक्ष्यांची किंवा सुरक्षेची जाणीव इतरांना करुन देतात. परिसरात खाली जमिनीवर साप, विंचू, उंदीर इ. भक्ष्य नजरेत पडले की भक्ष्यांचा आकार, दिशा, वेग यांचा ताळमेळ साधून आपली शिकार साधतात. रात्रभर मग या मटमट्यांचेच राज्य असते. मात्र अधुन मधून टिटव्यांचा टिवटिवाट सुरु असतो. टिटवी हा एकमेव पक्षी असा असावा की जो दिवसरात्र चोवीस तासही सजग राहतो. ईतर पक्षी विश्वरात्री मात्र शांत असतात.

शिक्रा, कापसी, कावळ्यासारखे शिकारी पक्षी परिसरात आले की मग ईतर लहान मोठे पक्षी अंडी, पिल्लं किंवा स्वतःच्या रक्षणासाठी किलबिलाट करतात. आपला जीव वाचविण्याचा प्रयत्न करत असतात. बहादूर आणि चपळ असलेला कोतवाल पक्षी मात्र शिकारी पक्ष्यांचा पाठलाग करुन त्याला हुसकावून लावतो आणि परिसरातील पक्ष्यांवर आलेले संकट दूर करतो. म्हणूनच तर कोतवाल पक्ष्याच्या आसऱ्याने इतर लहान पक्षी आपले जीवन चक्र सुरु ठेवतात. आदिमानव सुद्धा अन्नं मिळविणे, सुरक्षा इ. गोष्टी समुहात राहूनच शिकला. त्यातूनच त्याचा विकास साधत गेला. कदाचित पक्ष्यांकडूनच चांगले गुण मानव शिकला असावा, कारण पक्षी हे मानवापूर्वी लाखो, करोडो वर्षापासून या पृथ्वीवर आपलं जीवन जगत आले आहेत. पर्यावरणाचं संतुलन साधत आले आहे. हंसदेव चिरवित




कृष्णविलास या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे शिक्षणायाश्च यत्नेन रक्षणीयाश्च सर्वदा तदानीमेव हि नृपा जन्मसाफल्यमीरितम अर्थात पक्षी प्रयत्नाने राखावे व यास शिकवावे तेव्हाच मानवजन्म सफल झाला असे समजावे.

पक्षी हे मूर्तीमंत वात्सल्याचे प्रतीक आहे. जोडी जमली की आपले घरटे ते स्वतःच बांधतात. मादी त्यात अंडी देते. दोघे मिळून अंडी उबवतात. दोघेही पिल्लांचे डोळ्यात तेल घालून संगोपन करतात. पंख फुटेपर्यंत त्यांना चांगल उडायला शिकवितात. मादी दगावली तर नर पिल्लांचं संगोपन आत्मीयतेने करतो. दोघेही दगावली तर शेजारच्या घरट्यातील पक्षी पिल्लांना चारा भरवतात. तसेच पक्षी हे कर्मयोग्याचे मूर्तीमंत प्रतिक आहे. अनासक्त वृत्तीने पिल्लांची काळजी करतात. त्यांच्यासाठी जीव वचायला ते मागे पुढे पहात नाहीत. मात्र पिल्लं जाणती झाली की ते त्यांचा त्याग करतात. मोह, मायेच्या बंधनात ते कधी अडकत नाहीत. सुगरण पक्षी विणीनंतर पिल्लं मोठी झाली की घरटं सोडून देतो. म्हणून तर कबीराने म्हटले आहे 'ना घर मेरा, ना घर तेरा, दुनिया रैन बसेरा'.

निसर्गाचं पर्यायानं वातावरणच संतुलन बिघडवण्यास मानवानं मात्र सतत पुढाकार घेतला आहे. यात सर्वात प्रमुख गंभीर बाब म्हणजे लोकसंख्येचा भस्मासुर जगात माणसाची संख्या सात अब्जापर्यंत जाऊन पोहोचली आहे. गावांची नगरे, नगरांची महानगरे त्यामुळे जंगल, शेती याचा अतोनात ऱ्हास मानवाच्या निवासासाठी, विकासासाठी होत आहे. विकासासाठी औद्योगिकरण आणि त्यामुळे होणारे अपरिमित प्रदूषण या सर्वांच्या विळख्यात पृथ्वी संकटात सापडली आहे. याचा विचार कोण करणार ?

प्राणी कळपात राहातात, पक्षी थव्याने राहातात, माणूस समुहाने राहतो कारण मानव हा सुद्धा निसर्गाचा एक घटक आहे. मात्र केवळ चंगळवाद आणि स्वार्थाच्या हव्यासापोटी माणसाचा हा समूह अलिकडे दुभंगल्यासारखा वाटत आहे. त्यामुळे केवळ निसर्गाचं संतुलन, संवर्धन आणि रक्षण हेच प्रमुख भूमिका बजावू शकतो.

उपनिषदामध्ये झाडाच्या बी ला मानवी जनुकाची उपमा दिली आहे. झाडाचे बी आणि मानवी जनुकं यासारखे बी जमिनीत पुरल्यावर पावसाच्या थेंबामुळे ते अंकुरते, रोपटं होते. कालांतराने मोठं झाड तयार होते ते केवळ झाड नसते तर ते पशु पक्षी, किडे, किटकांचे एक गांव असते. ते जीवनभर उन्हा तान्हात एकाच ठिकाणी उभे राहून सजीव सृष्टीला केवळ देण्याचे काम करते. झाड जीवनभर काहीही न मागता केवळ देण्याचच काम करतात. तर मानव केवळ घेण्याचच काम करतो. होता होता आयुष्य गमावतो आणि देण्याचे पवित्र कार्यच विसरुन जातो. पर्यावरण समृद्धीचा एकच झरा, एक बी मातीत पेरा, ते वाढवा, रक्षण करा, निसर्ग हाच गुरु खरा, सुखी जीवनाचा मंत्र बरा.



प्रियंका मस्के
बी.ए. प्रथम

## स्त्री शक्ती : समाजाचे स्फुर्तीस्थान

अनादिकालापासून स्त्री शक्ती विविध क्षेत्राचे स्फुर्तीस्थान राहिले आहे. आजही तिने आपल्या क्षमता व कौशल्याने जगाला स्तिमित केले आहे. असे कोणतेही क्षेत्र तिने तिच्या सहभागा विना ठेवलेले नाही. मध्यंतरीच्या काळात स्त्री मुक्तीला संघर्ष होता पण आता त्या संघर्षाने महिला सबलीकरणाचे रुप घेतले आहे.

आधुनिक काळात घडत असलेल्या विविध घटना लक्षात घेता महिला असुरक्षित आहे असे वाटते. पण स्त्री शक्ती ही सर्व युगाचा प्रवाह धारण करणारी असल्याने तिच्या सुरक्षिततेचा प्रश्न उद्‌भवत नाही. भारतीय समाज व्यवस्थेने अचानक अल्पावधीत आधुनिकतेकडे वळण घेतल्यामुळे हे प्रकार दिसत आहे. आधुनिकीकरणाने समाजात आर्थिक समृद्धी आणली. त्यामागे सामाजिक जाणीवा बोथट केल्या. सर्व नाती संबंध, आप–पर भाव यांना एक कमर्शियल दृष्टीकोन मिळाला. कुणी काही म्हणतो पण आर्थिक उदारीकरणाची अनेक अनौरस अपत्ये आज समाजात दिसू लागली. महिलांविषयी जी आदरयुक्त भावना होती ती नष्ट होणे हे त्यातील एक अपत्य आहे.

२. विषयाचे प्राध्यापक प्रत्येक पाठावर वेगळी चाचणी घेतात.
३. विद्यापीठ स्तरावर विद्यापीठ परीक्षेअगोदर १०० गुणांची सराव परीक्षा घेतली जाते. तीन तासात अचूक उत्तरे लिहिण्याचा सराव करुन घेणे.
४. घटक चाचणीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना अभ्यासाला लावणे.
५. विद्यापीठ परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांबाबत वर्गात ओळख करुन देणे.
६. वर्गतासात झालेल्या भागावर लहान लहान प्रश्न तयार करुन विद्यार्थ्यांकडून उत्तरे सांगण्यास प्रवृत्त करणे.
७. वर्गतासात अकस्मात परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना अभ्यासात सतत प्रेरीत ठेवणे.
८. परीक्षेचे पेपर तपासणे, गुणपत्रिका देणे, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणी अंती विद्यार्थी कुठे चुका करतात हे लक्षात आणून कवकुवत विद्यार्थ्यांना वेगळे मार्गदर्शन करणे.
९. अधिक चांगली उत्तरे कशी लिहावीत ह्याबाबत परीक्षेपश्चात विषयांच्या प्राध्यापकांकडून मार्गदर्शन करणे.
१०. विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास प्रेरीत करुन इतर स्पर्धात्मक परीक्षेची माहिती देऊन विविध स्पर्धात्मक परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची ओळख विद्यार्थ्यांना करुन देणे.

**डॉ. मधुकर नंदनवार**
परीक्षा समिती सचिव

# ग्रंथालय समितीचे उपक्रम

यावर्षी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील पुस्तकांच्या संगणकीकरणा सोबतच बारकोडींगचे कार्य पूर्ण करण्यांत आले. ग्रंथालय समिती तर्फे ग्रंथालयाच्या दैनंदिन कामाव्यतिरिक्त काही उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतात. त्यापैकी एक म्हणजे सामान्य ज्ञानावर आधारित आव्हानात्मक प्रश्नांची स्पर्धा होय. ग्रंथालय समितीतर्फे चार दिवसांची ग्रंथप्रदर्शनी दिनांक ०२–०२–२०१६ ते ०५–०२–२०१६ ला आयोजित करण्यात आली. ग्रंथप्रदर्शनीला विद्यार्थ्यांनी व भिवापूरातील काही प्रतिष्ठित नागरीकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

**डॉ. मंगेश कढू**
प्रभारी ग्रंथालय समिती सचिव

# महिला अध्ययन व सेवा केंद्र

## वार्षिक अहवाल

## सत्र २०१५–२०१६

निरंतर प्रौढशिक्षण व विस्तार विभागाअंतर्गत महिला अध्ययन व सेवा केंद्राची स्थापना भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथे २०१५–२०१६ या सत्रात करण्यात आली. महाविद्यालयात स्थापना करण्यात आलेल्या महिला अध्ययन व सेवा केंद्रात बी. कॉम. भाग. १ चे ५७ विद्यार्थी, बी. ए. भाग १चे २७ विद्यार्थी व बी. एस. सी भाग १चे १३ विद्यार्थी असा एकूण ९७ विद्यार्थ्यांची नोंदणी विद्यापीठ स्तरावर करण्यात आली. त्यापैकी एकूण **७५** विद्यार्थ्यांनी विद्यापीठ [illegible] माहिती संकलन प्रकल्प व राष्ट्रसंत संस्कार प्रकल्पाचे कार्य पूर्ण केले. २०१५–२०१६ या सत्रात महिला अध्ययन व सेवा केंद्रांतर्गत विद्यापीठ परिपत्रकानुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयीन स्तरावर करण्यात आले.

सत्रारंभी ८ सप्टेंबर, **आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त** दि. १२.०९.२०१५ ला **'राष्ट्रनिर्माणात साक्षरतेची भूमिका'** या विषयावर महाविद्यालयात महिला अध्ययन व सेवा केंद्राद्वारे **निबंध लेखन स्पर्धेचे** आयोजन करण्यात आले. निबंध स्पर्धेत एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत कु. सोनल ढोणे, बी. कॉम. भाग १ हिचा प्रथम क्रमांक तर कु. प्रांजली एन. ठवकर या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक पटकाविला. दि. २८.०९.२०१५ ला महिला अध्ययन व सेवा केंद्र तसेच एन. एस. एस. यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्त्री भ्रूणहत्या' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सहभागी विद्यार्थिनींपैकी कु. नितु वाघ हिने प्रथम क्रमांक पटकाविला तर कु. सोनल ढोणे हिने द्वितीय क्रमांक पटकाविला.

दि. ०२.१०.२०१५ ला **गांधी जयंती** निमित्ताने काढण्यात आलेल्या रॅलीत महिला अध्ययन व सेवा केंद्राचा सहभाग होता. काढण्यात आलेल्या रॅलीच्या माध्यमातून भिवापूर येथील जनतेला पर्यावरण संरक्षण, स्त्री सक्षमीकरण व विविध सामाजिक समस्या असलेल्या विषयांबाबत घोषणेच्या माध्यमातून भिवापूर येथील जनतेत जनजागृती करण्यात आली. दि. २०.१०.२०१५ ला विद्यार्थ्यांसाठी सूचना काढून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राजकारणातील महिलानेतृत्व, स्त्री सक्षमीकरण व विद्यार्थ्यांची जबाबदारी, रोजगार विषयक जाणीव जागृती, तसेच महिलांपुढील आव्हाने इ. विषयावर महाविद्यालयातून प्रकाशित होणा--या **'निर्धार'** या वार्षिकांकासाठी लेख लिहिण्यास प्रोत्साहित करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थिनींना स्व कर्तव्याची जाणीव व्हावी तसेच त्यांना जीवन जगतांना येणाऱ्या सर्वसामान्य अडचणींना तोंड देता यावे यासाठी महिला अध्ययन व सेवा केंद्राद्वारे **'गृहशोभिका '** हे मासिक विद्यार्थीनींना वाचनास उपलब्ध करून देण्यात आले. जेणे करून जीवन जगतांना सर्वसामान्य ज्ञानाचा उपयोग त्यांना व्हावा.

दि. १४.१२.२०१५ ते २०.१२.२०१५ या कालावधीत सौ. वर्षा चोरडे, प्रशिक्षक, नागपूर यांनी भिवापूर येथील महिला व पुरुष यांना 'Art of living' चे प्रशिक्षण देऊन जीवन जगतांना येणाऱ्या अडथळ्यांना तोंड देण्याविषयीचे महत्त्व पटवून दिले. दि. २८.१२.२०१५ ला स्त्रियांना आपल्या अधिकाराची जाणीव व्हावी यासाठी भिवापूर गावात महिला अध्ययन व सेवा केंद्राद्वारा **'महिलांचे अधिकार व कायदे'** याविषयीची पत्रके वितरित करून भिवापूर येथील महिलांमध्ये जनजागृती करण्यात आली.

दि. २.०१.२०१६ रांगोळी स्पर्धा, पुष्पगुच्छ स्पर्धा तसेच पोस्टर स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थीनीमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा हा या मागील उद्देश आहे. रांगोळी स्पर्धेत कु. कल्याणी तिडके हिने प्रथम क्रमांक मिळविला तर संगिता खवास हिने द्वितीय क्रमांक मिळविला. पुष्पगुच्छ स्पर्धेत कु. विभा भोयर हिने प्रथम क्रमांक मिळविला तर कु. वैशाली दांडे हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या विविध स्पर्धासोबतच महाविद्यालयीन युवकांना महिलांच्या सामाजिक समस्यांची जाणीव व्हावी यासाठी सामाजिक व ज्वलंत प्रश्नांवर विषय देऊन **'पोस्टरस्पर्धेचे'** आयोजन करण्यात आले. त्यात एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पोस्टर स्पर्धेत कु. मयुरी शिवणकर हिने प्रथम क्रमांक मिळविला तर कु. रिता रामगुंडे हिने द्वितीय क्रमांक पटकविला. दि. ०७.०१.२०१६ ला 'स्त्री शक्तीशाली तर परिवार खुशाली' या घोष वाक्यावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. जोबी जॉर्ज उपस्थित होते. प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून श्री. परेश छाबरिया होते. त्यांनी वर्तमानात स्त्रियांनी सक्षम कसे बनावे याविषयी विविध उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. 'स्त्री शक्तीस्वास्थ्य शिबीर' दरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी 'डोळ्यांच्या तपासणी शिबिराचे' आयोजन करण्यात आले. डॉ. अमितकुमार कटियार, नागपूर यांनी याप्रसंगी एकूण ६७ विद्यार्थिनींची तपासणी करून गरजू विद्यार्थिनींना चष्मे वितरित केले.

दि. २४.०१.२०१६ ला महिला अध्ययन व सेवाकेंद्र तसेच एन. एस. एस. यांच्या संयुक्त विद्यमाने **'अंधश्रद्धा निर्मूलनात कायद्याचे महत्व'** या विषयावर श्री. प्रशांत सपाटे (राज्य सचिव, अंधश्रध्दा निर्मूलन समिती, उमरेड) यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकसंख्या शिक्षण मंडळाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राहिल कुरैशी होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. राजू नाईक तसेच मा. श्री. राजेश वानखेडे ( अनिस सदस्य ) यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना अंधश्रध्दा निर्मूलन समिती द्वारा पत्रके वाटून विद्यार्थ्यांना पत्रकातील प्रत्येक बाबी व कायद्याची ओळख विविध उदाहरणे व प्रसंग सांगून पटवून दिलीत. विज्ञान हाच आधार असुन अंधश्रध्देला बळी न पडता प्रत्येक गोष्टींची वास्तविकता ओळखूनच आपण पुढे पाऊल टाकले पाहिजे असा बोध विद्यार्थ्यांना दिला. सदर मार्गदर्शना सोबतच विविध प्रात्यक्षिकेही करून दाखविलीत. व त्याद्वारे अंधश्रध्दा निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला गेला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच गावातील गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक **२५.०१.२०१६** ला 'स्त्रियांचे आत्मसंरक्षण–आजच्या काळाची गरज' या विषयावर मा. शिवानी देशपांडे, (रिटायर्ड फ्लाईंग ऑफिसर, प्रहार, नागपूर) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादीवार होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मा. सौ. शिल्पा गुरडवार ( लुपिन फाउंडेशन, सी. एस. आर. प्रकल्प समन्वयक, मिहान, नागपूर) या होत्या. सदर मार्गदर्शन कार्यक्रमात मा. शिवानी देशपांडे यांनी महिलांची संपूर्ण क्षेत्रात असलेली महत्वपूर्ण कामगिरी विद्यार्थ्यांना तसेच बचत गटातील महिलांसमोर सांगितली. महिलांनी यापुढे अबला न राहता सबला बनण्याची गरज आहे हेपटवून दिले. यावेळी त्यांनी स्वतःचे अनुभव सांगून आत्मसंरक्षणाच्या विविध क्लुप्त्या सांगून प्रहार मिल्ट्री स्कुलच्या विद्यार्थिनी कु. रिया पिसे तसेच कु. वैष्णवी देशमुख यांनी प्रात्यक्षिके करून दाखविलीत. प्रात्यक्षिकानंतर मा. शिल्पा गुरडवार ( लुपिन फाउंडेशन, मिहान, नागपूर) यांनीही स्त्रियांच्या आत्मसंरक्षणाच्या आवश्यकते विषयीची कळकळ आपल्या भाषणातून व्यक्त केली.

अशाप्रकारे निरंतर प्रौढशिक्षण व विस्तार विभागातून आलेल्या परिपत्रकाप्रमाणे तसेच परिपत्रकाशिवाय इतरही कार्यक्रम घेण्यात यश आले. या यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जोबी जॉर्ज यांचे मोलाचे योगदान आहे.

प्रा. डॉ. अनिता वि. महावादीवार
कार्यक्रम अधिकारी

# लोकसंख्या शिक्षण मंडळ
## वार्षिक अहवाल - सत्र २०१५ - २०१६

भिवापूर महाविद्यालयामध्ये दरवर्षी प्रमाणे यावर्षी सत्र २०१५–१६ करीता लोकसंख्या शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली. या सत्रामध्ये एकूण १२२ विद्यार्थी, विद्यार्थिनींनी नोंदणी केली. दिनांक २ ऑक्टोबर २०१५ रोजी जागतिक अहिंसा दिनानिमित्य गावामध्ये अहिंसा रॅली मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या नेतृत्वात काढण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयातील ७६५ विद्यार्थी सहभागी झाले. या रॅलीमध्ये निरक्षरतेवर 'पथनाट्याचे' आयोजन केले होते. तसेच स्वच्छता अभियाना अंतर्गत महाविद्यालयातील परीसर व गावातील सार्वजनिक ठिकाण, मंदिर, बसस्टॉप, दवाखाना, रस्ते इत्यादी ठिकाणी साफ–सफाई करण्यात आली. आणि महाविद्यालयात वृक्षारोपण याप्रसंगी करण्यात आले.

भिवापूर महाविद्यालयाच्या लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता सिकलसेल तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा यांच्या माध्यमातून दिनांक १३ व १४ जानेवारी २०१६ ला डॉ. चकोले व त्यांचे सहकारी यांच्या नेतृत्वात महाविद्यालयातील एकूण ६२१ विद्यार्थ्यांची सिकलसेल तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ७ संशयित रुग्ण आढळून आले.

दिनांक १ डिसेंबर २०१५ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्य ग्रामीण रुग्णालय, भिवापूर कोर्ट, जे.सी.आय. नर्सिंग कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स विषयी रॅलीचे आयोजन करण्यात आले. व त्यानंतर एड्स रोगाविषयी विद्यार्थ्यांना जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये डॉ. हिवरकर, जे.सी. आय. चे अध्यक्ष डॉ. राऊत, डॉ. गुप्ता, भिवापूर कोर्टाचे न्यायाधीश श्री. समीर कुरणे व प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यानिमित्य एड्स रोग निर्मूलनाविषयी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. दिनांक २४ जानेवारी २०१५ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशिष्ट शिबीरा मध्ये श्री. प्रशांत सपाटे, राज्य सचिव अंधश्रद्धा निर्मूलन समिती, उमरेड यांच्यातर्फे अंधश्रद्धा व जादूटोणा विरोधी कायदा यावर कार्यशाळेचे आयोजन अड्याळ या गावी करण्यात आले.

दिनांक १२ जानेवारी ते २७ जानेवारी २०१६ रोजी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्याकडून धान्य, उनी कपडे, ब्लॅंकेट आणि पैसे इ. साहित्य जमा करण्यात येऊन संस्थेचे संस्थापक स्वर्गीय भाऊसाहेब मुळक यांच्या जयंती प्रित्यर्थ दिनांक ३१ जानेवारी २०१६ ला भिवापूर गावातील झोपडपट्टीमधील गरीब व गरजू लोकांना व [illegible] मतीमंद व अपंग विद्यार्थ्यांच्या निवासी शाळेतील वृद्ध, अपंग, निराधार विद्यार्थ्यांना बिस्कीटे व वरील साहित्य वाटप करण्यात आले. दिनांक २ फेब्रुवारी २०१६ ला महाविद्यालयात रक्तदान आणि रक्तगट व हिमोग्लोबिन तपासले. या शिबीरासाठी जीवन ज्योती ब्लड ॲन्ड कंपोनेन्ट्स, नागपूरचे मिस रचेल मॅथ्यु, मिस शिजा अनिश, मिस प्रेरणा नाईक, मि. स्वप्नील बघेल, मि. लोकेश देशमुख, निलेश मेश्राम, आसीफ कुरैशी, दिनेश रामटेके, राजेश चौधरी, अरूण मोथंडे, मिस सुनिता शेन्डे, किशोर खोब्रागडे, संजय नागपूरे यांनी रक्त संकलनाचे कार्य केले. या रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी रक्तदान करून केले. याप्रसंगी प्रा. डॉ. विजय दिघोरे, प्रा. डॉ. सुनिल शिंदे, प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण, प्रा. किशोर शेंडे, प्रा. अनिता महावादीवार प्रामुख्याने उपस्थित होते. महाविद्यालयामध्ये दि. २ व ३ फेब्रुवारी २०१६ ला वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये लोकसंख्या विस्फोट व पर्यावरण यावर पोस्टर स्पर्धा घेण्यात आली.

अशाप्रकारे सत्र २०१५–१६ मध्ये महाविद्यालयामध्ये लोकसंख्या शिक्षण मंडळातर्फे विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रा. डॉ. राहील कुरैशी
प्रभारी प्राध्यापक
लोकसंख्या शिक्षण मंडळ




# भिवापूर महाविद्यालयात परिसर मुलाखतीचे आयोजन

भिवापूर परिसरातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा या उदात्त हेतूने संस्थेचे सचिव माजी मंत्री श्री. राजेंद्रजी मुळक यांच्या अथक प्रयत्नाने भिवापूर महाविद्यालयात 'विद्यार्थी रोजगार मार्गदर्शन केंद्राच्या' वतीने दि. १६ मार्च २०१६ ला परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. पाथफाइंडर फाउंडेशन नागपूर यांच्या माध्यमातून SBI, IDBI, BANK, DISH TV व GODREJ मध्ये 'ग्राहक सेवा प्रतिनिधी' या पदाकरीता सदर मुलाखतीचे आयोजन भिवापूर महाविद्यालयात करण्यात आले. पाथफाइंडर फाउंडेशन नागपूरचे अध्यक्ष श्री. धनंजय बालपांडे हे आपल्या तीन सहाकार्यांसोबत परिसर मुलाखती घेण्यासाठी उपस्थित होते. श्री. प्रदीप खाडे, शाखा व्यवस्थापक, Global Innosource Pvt. Ltd., Nagpur श्री. अमोल तिडके आणि श्री. विनोद Resource Manager, Global Innosource Pvt. Ltd. Nagpur मुलाखतीमध्ये भाग घेण्यासाठी भिसी, उमरेड, पवनी, लाखांदूर, सिंदेवाही, नागभीड व ब्रम्हपुरी येथील उमेदवारांनी मोठया संख्येने उपस्थिती दर्शविली. जवळपास ३३० विद्यार्थी परिसर मुलाखत देण्यासाठी उपस्थित होते. पैकी १८२ विद्यार्थी अंतिम फेरीसाठी निवडल्या गेले. निवडलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम फेरीची मुलाखत संबंधित कंपनीच्या नागपूर येथील कार्यालयात घेण्यात येईल.

कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सुद्धा अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. राहील कुरैशी यांनी सर्वांचे आभार मानले.

**राहील कुरैशी**
सदस्य–सचिव
विद्यार्थी रोजगार मार्गदर्शन केंद्र



# सांस्कृतिक व शैक्षणिक वार्षिक अहवाल
## सत्र २०१५ - २०१६

सत्र २०१५–२०१६ या शैक्षणिक वर्षात नियमित अभ्यासक्रमासोबत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन भिवापूर महाविद्यालयात करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी असणा–या कलात्मक सुप्त गुणांना वाव मिळावा, महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांना एक वेगळे दालन, व्यासपीठ मिळावे. भविष्यात विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी या व्यापक उद्देश समोर ठेऊन महाविद्यालयातील सांस्कृतिक समितीतर्फे सत्रातील पहिल्या व दुसऱ्या शैक्षणिक सत्रात विविध उपक्रम राबविले गेले त्या शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचा आढावा पुढीलप्रमाणे–

दि. १.८.२०१५ ला महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीचा कार्यक्रम हा प्राचार्यांच्या कक्षेत घेण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी प्राध्यापकांनी कला व वाणिज्य शाखेत वर्ग तासात हा कार्यक्रम घेऊन महापुरुषांच्या दोन्ही थोर विभूतींच्या संदर्भात मोलाचा संदेश दिला. दोन्ही विभूतींना वर्गात श्रध्दांजली वाहण्यात आली.

दि. १५.८.२०१५ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी गावातील प्रतिष्ठित नागरीक तसेच वरीष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. ५ सप्टेंबर २०१५ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्य 'शिक्षक दिनाचे' औचित्य साधुन वरिष्ठ व कनिष्ठ विभागात विद्यार्थ्यांकडून स्वयंशासन घेण्यात आले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्य प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या अध्यक्षतेखाली, डॉ.सुनिल शिंदे, व डॉ. किशोर शेंडे सांस्कृतिक समिती सचिव प्रा . सोमेश्वर वासेकर या अतिथींच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयात प्रथम वर्षाला प्रवेशीत विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्रविण चौधरी, संचालन कु. मंजूषा बोरडे व आभार प्रविण चौधरी यांनी मानले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग दि. २१.९.२०१५ च्या पत्रान्वये राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ 'इंद्रधनुष्य' व युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धेत निवड चाचणी करिता वक्तृत्व स्पर्धेत १. प्रविण चौधरी बी.ए. ३, २. कु. रोशनी वैरागडे बी.एस.सी. भाग. १ भाग घेतला.

२ ऑक्टोबर २०१५ रोजी महात्मा गांधी जयंतीचा कार्यक्रम प्रसंगी मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधीजीच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. नंतर संपूर्ण गावातून शांतता दिंडी काढण्यात आली. साक्षरता, आत्मसुरक्षा, पर्यावरण, लोकसंख्येवर नियंत्रण व शांततेचा संदेश दिंडीच्या व फलक तसेच नारे यांच्या माध्यमातून देण्यात आला. मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात समारोपीय कार्यक्रम घेण्यात आला.

दि. ११.१०.२०१५ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम संपन्न झाला. राष्ट्रसंतावर दोहे, सामुदायिक प्रार्थना, व डॉ. शिंदे यांनी विचार व्यक्त केले.

दि. १५.१०.२०१५ ला महाविद्यालयात सांस्कृतिक कमिटीतर्फे विद्यार्थ्यांची सांस्कृतिक समिती गठन करण्यात आली. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व सदस्यांची निवड केली.

दि. २४.१०.२०१५ ला संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी मा. स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. या निमित्य गावातील गरीब व होतकरु नागरीकांना महाविद्यालयातर्फे अन्नदान, ब्लॅंकेट व वस्त्रदान करण्यात आले.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ५८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य ६ डिसेंबर २०१५ रोजी समिती प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. वैशाली रहाटे व डॉ. अनिता महावादीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे व गीते सादर झाली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोन्तर रौप्य महोत्सवी जयंती (१२५) शताब्दी वर्ष संविधान सप्ताह अंतर्गत महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन कमिटी प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांनी केले. या निमित्ताने दि. १८.१२. २०१५ रोजी वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही' या विषयावर मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषेतून निबंध स्पर्धा घेण्यात आली. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रवीण चौधरी, द्वितीय क्रमांक प्रणाली मेश्राम व तृतिय क्रमांक कु. स्नेहल राठोड यांनी पटकावला. निबंध परिक्षणाचे कार्य डॉ. शेंडे, डॉ. नंदनवार व प्रा. वासेकर यांनी केले.

दि. २१.१२.२०१५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोन्तर रौप्य महोत्सवी जयंती (१२५) शताब्दी वर्ष संविधान सप्ताह अंतर्गत महाविद्यालयात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मनिरपेक्षता' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. तसेच याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्यावर व या महान विभूतीनी दिलेल्या जागतीक योगदानावर आधारित गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. ४.१.२०१६ रोजी महाराष्ट्र शासनातर्फे पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग जागर युवा स्वच्छते अंतर्गत तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा–पंचायत समिती भिवापूर जि. नागपूर, मार्फत घेण्यात आली. या वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी भाग घेऊन प्रथम–५००० रु, द्वितीय–३००० रु, व तृतिय–२००० रु बक्षिस पटकावले. प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरावर वरिष्ठ विभाग प्रथम–प्रविण चौधरी, द्वितीय– कु. निशी सावळे तृतिय–छबीला शंभरकर कनिष्ठ विभाग द्वितीय–कु. रचना नंदेश्वर व तृतिय–प्रविण पांगुळ यांची दि. ०७.१.२०१६ ला स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

दि. १२.१.२०१६ ला महाविद्यालयात सांस्कृतिक कमिटीतर्फे विद्यार्थ्यांची सांस्कृतिक समिती गठन करण्यात आली. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व सदस्यांची निवड करण्यात आली.

दि. २३ जानेवारी २०१६ ते २८ जानेवारी २०१६ या काळात राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर दत्तक ग्राम अड्याळ येथे संपन्न झाले.

२६ जानेवारी २०१६ रोजी ध्वजारोहनाचा कार्यक्रम मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते संपन्न झाला.
दि. १, २ व ३ फेब्रुवारी २०१६ या दिवशी महाविद्यालयात 'वार्षिकोत्सवाचे आयोजन करण्यात आले.
दि. १.२.२०१६ ला विविध क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. जॉर्ज यांच्या हस्ते करण्यात आले. कबड्डी, कॅरम, पॉवर लिफ्टिंग, वेट लिफ्टिंग, चमचा निंबू, चॉकलेट स्पर्धा, पोता दौड ई. स्पर्धा पार पडल्या.

दि. २.२.२०१६ ला संस्थेचे सदस्य मा. डी.के. महाडिक यांच्या हस्ते वार्षिकोत्सवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, प्रमुख अतिथी म्हणून मा. पद्माकरजी अग्रवाल, तहसीलदार मा. शितलकुमार यादव, नगर पंचायतचे नगराध्यक्ष श्री. लवजी जनबंधु, मां. दिलीपजी गुप्ता, मा. शफीजी शेख, मा. शंकरजी डडमल, डॉ. सुनिल शिंदे, मा. किशोर शेंडे डॉ. मधुकर नंदनवार उपस्थित होते. यावेळी ग्रंथालयाद्वारे प्राध्यापकांकडील संग्रहित ग्रंथांची ग्रंथ प्रदर्शनी लावण्यात आली. उद्घाटन कार्यक्रमानंतर लगेच उद्घाटक व पाहुण्यांनी रांगोळी, पोस्टर स्पर्धा, औषधी वनस्पती व विज्ञान प्रदर्शनी इ. स्पर्धांचे उद्घाटन करुन समाधान व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून सत्कार करुन गौरविण्यात आले. याच दिवशी

आनंद मेळावा, व एकांकिका स्पर्धा संपन्न झाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनिल शिंदे, मनोगत प्रविण चौधरी, संचालन डॉ. अनिता महावादीवार, व आभार प्रा.सोमेश्वर वासेकर यांनी मानले. याच दिवशी वार्षिकोत्सव कार्यक्रमात गीतगायन, एकांकिका व फॅशन शो चे आयोजन करण्यात आले.

दि. २.२.२०१६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती (१२५) शताब्दी वर्ष संविधान सप्ताह अंतर्गत महाविद्यालयात समिती प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांच्यातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्राची प्रदर्शनी तसेच ग्रंथ प्रदर्शनी लावण्यात आली. या वेगळ्या उपक्रमाची वार्षिकोत्सवातील पाहुण्यांनी स्तुती केली.

दि. ३ फेब्रुवारी २०१६ एकल व समुह नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी डॉ. जगदीश राठोड यांनी साकार केलेला संमोहन स्टेज शो चा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. याच दिवशी दुपारी ४.३० वाजता बक्षिस वितरणाचा कार्यक्रम अध्यक्ष प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. मा. प्रतापरावजी बोराडे, मा. शंकरलालजी गुप्ता, मा. दिलीपजी गुप्ता यांच्या हस्ते क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धात क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच वर्षभरात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा, शिक्षक दिन व इतर स्पर्धात क्रमांक पटकविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमानंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भोजनाचा आस्वाद घेतला. वार्षिकोत्सवाच्या आयोजनाची जबाबदारी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार व समिती सचिव प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. कुरैशी यांनी तर आभार प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी मानले. वार्षिकोत्सव संपन्न करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. जोबी जॉर्ज यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य व परीश्रम घेतले.

दि. २० .२.२०१६ रोजी उमरेड अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजित आंतर महाविद्यालयीन नृत्य स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

दि. २३.१.२०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती (१२५) शताब्दी वर्ष संविधान सप्ताह अंतर्गत महाविद्यालयात 'संविधान प्रबोधनाचा' कार्यक्रम घेण्यात आला. भारतीय संविधानाचे प्रबोधन व्हावे या दृष्टीने वंदना संघ, दिक्षाभूमी, नागपूर आणि लार्ड बुध्दा टि.व्ही. चॅनल यांच्या तर्फे प्रा. देवीदास घोडेस्वार यांनी व्याखान दिले. यावेळी मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांचे तसेच नगराध्यक्ष मा. लवजी जनबंधु व पत्रकार श्री. पुरुषोत्तम भिसीकर यांनीही मार्गदर्शन केले.

भारतीय संविधाची निष्ठा बाळगण्याची शपथ ग्रहणाचा कार्यक्रम प्रसंगी मा. प्राचार्य व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शपथ ग्रहण केली.

दि. १५.२.२०१६ ते २६.२.२०१६ या कालावधीत विद्यापीठ स्तरावरील महाविद्यालयीन वार्षिक सराव परीक्षा कला व वाणिज्य शाखेत परीक्षा समितीतर्फे घेण्यात आली.

दि. २.३.२०१६ ला महाविद्यालयातील बी.ए.३, बी.कॉम.३ व बी.एस.सी.३ च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ देण्यात आला.

दि. १४.४.२०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५वी जयंतीचा कार्यक्रम प्रा. डॉ. किशोर शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या दिवसाचे औचित्य साधून १४ एप्रील २०१६ ला विद्यार्थी प्रेरणा दिन म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करण्यात आली.

डॉ. मधुकर नंदनवार, प्रा. सोमेश्वर वासेकर
सांस्कृतिक समिती

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर
# राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल २०१५-२०१६

०२ ऑक्टोबर १९६९ साली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेची सुरूवात झाली. तेव्हापासूनच महाविद्यालयात ही योजना सुरू झाली. ४४ वर्षांची समृध्द परंपरा असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या नियमित उपक्रमांना दर मंगळवार व बुधवारच्या तासांना १ऑगस्ट पासून स्वयंसेवकांची आचारसंहिता, सेवाभाववृत्ती निर्माण करून युवक–युवतींना यात सहभागी करून घेण्यात येते, नियमित उपक्रमाअंतर्गत श्रमसंस्कार, आरोग्यसेवा, रक्तदान शिबीर, पर्यावरण जनजागृती, बौध्दिक, सांस्कृतिक व व्यक्तिमत्व विकासाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. दर मंगळवारी व बुधवारी दुपारी १. ०० ते २.३० या वेळात तास घेतले जातात.

**रासेयो नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा**

सत्रारंभी नव्याने सहभागी झालेल्या विद्यार्थ्या करीता नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमा विषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत नवीन विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण तर माजी विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन असा दुहेरी हेतू साधला जातो. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व, स्वयंसेवकांचे कर्तव्य व आचारसंहिता इत्यादी विषयीचे मार्गदर्शन मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी केले. प्रशिक्षणात माजी विद्यार्थ्यांचे अनुभव सांगून नवीन विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करण्याचे काम केले जातात. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे व सहकार्यक्रम अधिकारी डॉ अनिता महावादीवार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची आचारसंहिता व त्यांचे महत्व विषद करून सांगितले व आतापर्यंत रासेयोची यशस्वी वाटचाल कशी झाली या संदर्भात सर्व इतिहास विद्यार्थ्यासमोर ठेवला.

**ध्वजारोहण :**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज याच्या हस्ते ध्वजारोहण केले . यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. यावेळी मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता व व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

**रासेयो वर्धापन दिन व युवावेष सप्ताह :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचा ४६ वा वर्धापन युवकांच्या अपार उत्साहात संपन्न झाला. त्याचबरोबर सत्र २०१५–२०१६ मध्ये भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथे युवावेष सप्ताह २०१५ चे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताह निमित्य विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले.

दिनांक २४/०९/२०१५ ला युवावेष सप्ताह २०१५ चा **उद्‌घाटन सोहळा** उत्साहात संपन्न झाला. या युवावेष सप्ताहाचे उद्‌घाटन मा. श्री. शितलकुमार यादव, तहसिलदार, तहसिल कार्यालय, भिवापूर यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज होते. विशेष अतिथी म्हणून मा. श्री दिलीपजी गुप्ता उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. शंकर दडमल माजी रासेयो स्वयंसेवक, भिवापूर तसेच मा. श्री. शरद मिरे, माजी रासेयो स्वयंसेवक, भिवापूर उपस्थित होते. तर डॉ. सुनिल शिंदे, प्रा. किशोर शेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. डॉ. मोतीराज चव्हाण यांनी प्रास्ताविकातून युवावेष सप्ताहाच्या कार्यक्रमा विषयीची रूपरेषा सांगितली.

मा. श्री. शितलकुमार यादव, यांनी आपल्या भाषणात युवकांनी समाजा विषयीची बांधिलकी ठेवून आपले जीवन कसे पूर्ण करायचे तसेच आहे त्या परिस्थितीला सामोरे जाण्या विषयीचे योग्य उद्‌बोधन केले. उद्‌बोधना बरोबरच भिवापूर परिसरातील काही समस्यांचेही चिंतन केले. मा. श्री. दिलीपजी गुप्ता यांनी युवकांना श्रमाचे महत्त्व सांगितले तर मा. श्री. शंकर डडमल तसेच मा. श्री. शरद मिरे यांनी आपल्या भाषणातून युवकांना त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी सांस्कृतिक विकासाची गरज असल्याचा सल्ला दिला. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युवकांमध्ये जिद्द, चिकाटी असेल तर ते जीवनात ठरविलेले लक्ष्य निश्चितच गाठू शकतील ते समजून घेण्यासाठी विविध विषयाचा आधार घेवून समजावून सांगितले. यासोबतच महाविद्यालयाच्या वर्तमान विकासाचाही आढावा घेतला.

या उद्‌घाटन सोहळ्याचे संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजनेच्या साहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिता महावादीवार यांनी आभार मानले.

दिनांक २५/०९/२०१५ ला सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत **'पोस्टर स्पर्धा'** घेण्यात आली. या स्पर्धेत कु. अदिती ठाकरे हिने प्रथम क्रमांक पटकविला तर कु. अल्का नांदेकर हिने द्वितीय क्रमांक मिळविला. याशिवाय प्रोत्साहनपर क्रमांक कु. नम्रता वाघमारे हिला मिळाला.

दिनांक २६/०९/२०१५ ला. **'श्रमसंस्कार कार्यक्रमाचे** आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालय व आसपासच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज तसेच प्राध्यापक वृंद, रासेयोचे सर्व विद्यार्थी या श्रमसंस्कार कार्यक्रमात सहभागी झाले होते.

दिनांक २८/०९/२०१५ ला 'स्त्री–भ्रूणहत्या' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेच्या परीक्षणाचे कार्य मा. श्री. शंकर डडमल तसेच मा. श्री शरद मिरे यांनी केले. एकूण ६ स्पर्धकांमधून प्रथम क्रमांक कु. नितु वाघ हिला मिळाला तर द्वितीय क्रमांक कु. सोनल ढोणे यांना मिळाला.

दिनांक २९/०९/२०१५ ला सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत **'रस्ता सुरक्षा अभियान'** या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. निबंध स्पर्धेत एकूण ३० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. सहभागी विद्यार्थ्यांमधून कु. अलका नांदेकर हिचा प्रथम क्रमांक आला.

दिनांक ३०/०९/२०१५ ला विविध 'सांस्कृतिक कार्यक्रमांचे' आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध संस्कृतीची ओळख करून दिली.

दिनांक ०१/१०/२०१५ ला सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी विद्यार्थ्यांमधून प्रथम क्रमांक कु. अंकिता डहारे हिला मिळाला तर कु. मोनाली काळे हिने द्वितीय क्रमांक मिळविला.

दिनांक ०२/१०/२०१५ ला स्थानिक भिवापूर महाविद्यालयात **'जागतिक अहिंसा दिन व व्यसनमुक्ती दिंडीचे'** आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिंडीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरूवात केली. भिवापूर महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या जागतिक अहिंसा दिन दिंडीत महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. 'झाडे लावा झाडे जगवा',' शिकलेली आई घरादाराला पुढे नेई'. 'दारूची नशा जीवनाची दुर्दशा' अशा विविध घोष वाक्यांनी गावात जनजागरण करण्यात आले. दिंडीचा समारोप महाविद्यालयाच्या

प्रांगणात करण्यात आला. युवावेध सप्ताह यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रासेयोच्या स्वंयसेवकानी अथक परीश्रम घेतले.

डॉ. मोतीराज चव्हाण
विभागीय समन्वयक व कार्यक्रम अधिकारी रा. से. यो.

**जागतिक एड्स दिन :**

दुसऱ्या सत्रात ०१/१२/२०१६ ला जागतिक एड्स दिन असल्यांमुळे ग्रामीण रूग्णालय, जे.सी.आय.,राष्ट्रीय सेवा योजना, लोकसंख्या शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गावातून एड्स रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरूवात ग्रामीण रूग्णालयातून दिवाणी व फौजदारी न्यायालय भिवापूरचे न्यायाधिश मा. श्री. समीर कुरने यांनी हिरवी झेंडी देऊन करण्यात आले. गावातील चौका–चौकातून विद्यार्थ्यांनी पथनाटय सादर केली. रॅलीचा समारोप भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथे प्राचार्य डॉ. जोबी जार्ज यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, प्रा. डॉ. राहील कुरैशी, जे.सी. आय. चे माजी अध्यक्ष डॉ. प्रदिप गुप्ता, जेसीआयचे अध्यक्ष डॉ. संतोष राऊत, डॉ. वसंत खवास, डॉ. अग्रवाल, डॉ. नागोसे व श्री. तौफिक पटेल उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांनी एड्स या गंभीर आजारासंबंधी माहिती देऊन विद्यार्थ्यांना जागृत केले. तसेच प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून एड्स या विषयावर आजच्या तरूण वर्गाने गांभीर्याने पाहिले पाहिजे तसेच या आजाराविषयी जनजागृती करून समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य केले पाहिजे असे सांगितले. तसेच या आजाराविषयी प्राथमिक माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या रॅलीमध्ये गावातील संपूर्ण डॉक्टर मंडळी व गावातील प्रतिष्ठीत नागरिक सहभागी झाली होते.

**सिकलसेल तपासनी शिबीर :**

भिवापूर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता सिकलसेल तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा यांच्या माध्यमातुन दिनांक १३ व १४ जानेवारी २०१६ ला डॉ. वकोले व त्यांचे सहकारी यांच्या नेतृत्वात महाविद्यालयातील एकुन ६२१ विद्यार्थ्यांची सिकलसेल तपासनी करण्यात आली. त्यामध्ये एकुन ०७ संशयीत रूग्ण आढळून आले.

**शाळा बाह्य विद्यार्थी सर्वेक्षण :**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रा. तु म. नागपूर विद्यापीठ, नागपूर कडून प्राप्त झालेल्या परिपत्रकानुसार भिवापूर महाविद्यालय, भिवापूर द्वारा राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत शाळा बाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले.

दि. २०.०१.२०१६ ला भिवापूर महाविद्यालय येथे सकाळी १०.०० वाजता सर्वेक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमाला मा. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, भिवापूर, मा. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, भिवापूर, तसेच विषय तज्ञ, पंचायत समिती भिवापूर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, प्राध्यापक गण तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी इ. ची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमात विस्तार अधिकाऱ्यांनी

आपल्या भाषणात शाळा बाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याविषयीचे मार्गदर्शन केले. शाळा बाह्य विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी सर्वेक्षणाला सुरूवात केली. सदर सर्वेक्षणात रासेयो च्या सर्व विद्यार्थ्यांनी भिवापूर, दानीबोडी, हिवरा, मरूपार, येथे शाळबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेतला. परंतु एकही शाळबाह्य विद्यार्थी सर्वेक्षणा दरम्यान आढळून आला नाही.

दि. २१.०१.२०१६ ते २७.०१.२०१६ या कालावधीत अड्याळ (पुनर्वसन) येथे भिवापूर महाविद्यालय, भिवापूर राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबीर आयोजित करण्यात आले. शिबीर कालावधीत नियोजित कार्यक्रमा व्यतिरिक्त उर्वरित वेळेत एकुण ७५ विद्यार्थ्यांनी शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला. परंतु तेथेही शाळाबाह्य विद्यार्थी आढळून आले नाहीत.

**'स्वच्छ – स्वस्थ भारताकरिता युवाशक्ती' विशेष वार्षिक शिबीर**
**दत्तक ग्राम – अड्याळ (पुनर्वसन)**

भिवापूर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे सत्र २०१५–१६ चे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबीर दिनांक २१/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ या कालावधीत अड्याळ (पुनर्वसन) येथे संपन्न झाले. या सात दिवसीय विशेष शिबिराची पूर्वतयारी दिनांक २१/०१/२०१६ पासून करण्यात आली. याच दिवशी महाविद्यालयाचे रा.से.यो. चे स्वंयसेवक हे शिबीरस्थळी उपस्थित झाले. शिबिरात एकुण ७५ स्वयंसेवक सहभागी झाले होते. शिबिराच्या पहिल्या दिवशी शिबिरातील विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करण्यात आले. व शिबिराच्या पुढील कार्यक्रमाचेही नियोजन करण्यात आले. शिबिर प्रमुख प्रा. डॉ. विजय दिघोरे व प्रा. डॉ. अनिता महावादीवार यांच्या नेतृत्वात व सहकारी प्राध्यापक यांच्या सहकार्याने शिबीर कालावधीत अनेक समाजाभिमुख कार्यक्रम व प्रकल्प राबविण्यात आले.

दिनांक २२.०१.२०१६ ला महाविद्यालयीन विशेष शिबिराचा उद्घाटन सोहळा असल्याने नियोजित वेळेनुसार रा.से.यो.चे स्वयंसेवक उद्घाटन सोहळ्याच्या कामाला लागले. शिबिराचे उद्घाटन मा. श्री. संजय पवार (पोलीस निरीक्षक, उमरेड) यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज व विशेष अतिथी म्हणून मा. श्री. चांडक साहेब (दत्तक ग्राम पुनर्वसन अधिकारी), प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री शरदजी देशमुख, (अध्यक्ष, शाळा समिती, अड्याळ),मा. श्री. ओंकारनाथ दाणी, (मुख्याध्यापक, जि. प. उच्च प्राथमिक शाळा, अड्याळ), मा. श्री. शेषराव खारखुरे, मा. श्री. विलासजी कुडेगावे, मा. श्री. सुरेश सोनटक्के, मा. श्री. सुरज ठाकरे, अड्याळ उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. सुनिल शिंदे, प्रा. किशोर शेंडे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजनाच्या ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी केले. संचालन सह. कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिता महावादीवार तर कार्यक्रमाचे आभार प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी मानले.

या उद्घाटनीय कार्यक्रमात मा. संजय पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी विद्यार्थ्यांना सुदृढ आरोग्याचा मूलमंत्र दिला. मा. श्री. ओंकारनाथ दाणी यांनी विद्यार्थ्यांना शिस्तीचे धडे दिले. विद्यमान प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी महाविद्यालयाच्या ऐतिहासिक वाटचालीचा आढावा घेऊन महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची ओळख ग्रामवासीयांना करून दिली. यासोबतच संस्थापक अध्यक्ष स्व. भाउसाहेब मुळक यांचे स्वप्न साकार करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले. मा. श्री. शरदजी देशमुख, मा. विलासजी कुडेगावे यांनी अडयाळ गावात होणाऱ्या श्रमदान तसेच असणाऱ्या समस्या सोडविण्यास मदत करण्याचे आश्वासन दिले. या दिवशी रात्री रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले.

**दिनांक– २३/०१/२०१६**

सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगा प्राणायम आटोपून जनजागरण दिंडीच्या तयारीला सर्व मुले लागली. सकाळी ७.१५ वाजता कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, कार्यक्रम यांच्या नेतृत्वात जनजागरण दिंडीला हिरवी झेंडी दाखवून संपूर्ण गावातून ग्रामस्थांना पर्यावरण, व्यसनमुक्ती, लोकसंख्या शिक्षण, एड्स जागृती, महिला सक्षमीकरण, निरक्षरता व अंधश्रध्दा निर्मूलनाचा संदेश देण्यासाठी गावातून लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दुपारच्या सत्रात **'समाजातील व्यसनाधिनता एक मुख्य समस्या'** या विषयावर प्रा. डॉ. गोपीचंद निंबार्ते (व्ही.एन.आ.टी. नागपूर),तसेच प्रा.उमेश गुरलवार (रिसर्च स्कॉलर,व्ही. एन. आय. टी., नागपूर) यांनी **'विद्यार्थी आणि संभाषण कला'** या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमानंतर स्वयंसेवक दत्तक ग्राम अडयाळ येथे शाळा बाह्य सर्वेक्षण करण्यास गेले.

संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात रा.से.यो. स्वयंसेवकांनी पर्यावरण व व्यसनमुक्ती तसेच आरोग्य व स्वच्छता या विषयावर कार्यक्रम सादर केलेत.

**दिनांक–२४/०१/२०१६**

सकाळी ६.०० वाजता प्रार्थना आटोपून ६.३० वाजता महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. आदित्य सारवे यांनी रा.से.यो. च्या स्वयंसेवकांना प्राणायाम व योगा विषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर अल्पोपहार आटोपून श्रमदानाचे काम हाती घेतले. श्रमदानासाठी विविध ग्रुप तयार करून प्रत्येक ग्रुपला विविध परिसर श्रमदानासाठी देण्यात आला. दत्तक ग्राम अडयाळ (पुनर्वसन) येथील जि. प. शाळेतील तसेच शाळेच्या परिसरातील स्वच्छतेची कामे हाती घेण्यात आलीत. प्रत्येक ग्रुपनी श्रमदानाचे काम हाती घेतले. त्यात रस्त्याची निर्मिती, नालीचे खोदकाम, नालीसफाई, कचरा निर्मूलन, गाजरगवत निर्मूलन इत्यादी कामे रासेयोच्या स्वयंसेवकानी केलीत. श्रमदानानंतर प्रत्येक ग्रुपने कार्यक्रम अधिकारी, प्रा. डॉ. विजय दिघोरे तसेच सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादीवार तसेच प्रा. डॉ. नंदनवार यांच्या मदतीने अडयाळ गावातील जनतेला २०० फळझाडांचे प्रत्यक्ष घरोघरी जावून वाटप केले.

दुपारच्या सत्रात **'अंधश्रध्दा निर्मूलनात कायद्याचे महत्व'** या विषयावर श्री. प्रशांत सपाटे (राज्य सचिव, अंधश्रध्दा निर्मूलन समिती, (अनिस) उमरेड) यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकसंख्या शिक्षण मंडळाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राहिल कुरैशी होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. राजू नाईक तसेच

मा. श्री. राजेश वानखेडे ( अनिस सदस्य )यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम मार्गदर्शकांनी रा. से. यो. च्या स्वयंसेवकांना तसेच अड्याळ येथील जनतेला अंधश्रध्दा निर्मूलन समितीद्वारा पत्रके वाटून विद्यार्थ्यांना पत्रकातील प्रत्येक बाबी व कायद्याची ओळख विविध उदाहरणे व प्रसंग सांगून पटवून दिलीत. विज्ञान हाच आधार असून अंधश्रध्देला बळी न पडता प्रत्येक गोष्टीची वास्तविकता ओळखूनच आपण पुढे पाऊल टाकले पाहिजे असा बोध विद्यार्थ्यांना दिला. सदर मार्गदर्शनासोबतच विविध प्रात्यक्षिकेही करून दाखविलीत. व त्याद्वारे अंधश्रध्दा निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला गेला. या कार्यक्रमात रा. से. यो. चे स्वयंसेवक तसेच अड्याळ गावातील गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संध्याकाळी ६.०० वाजता विद्यार्थ्यांसाठी विविध बौध्दिक खेळांचे आयोजन करण्यात आले. रात्री ८.०० वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून गावकऱ्यांचे मनोरंजन करण्यात आले.

**दिनांक–२५/०१/२०१६**

सकाळी ६.०० वाजता प्रार्थना आटोपून रा.से.यो. स्वयंसेवकांना योगा व प्राणायामाचे धडे देण्यात आले. श्रमदानाच्या कार्यक्रमात गावातील रस्त्यांच्या स्वच्छते शिवाय शौचालयाचे खड्डे करण्याचे काम हाती घेण्यात आले. या दिवशी अड्याळ गावातील प्रमुख व्यक्ती तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दियोरे, सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादीवार, महाविद्यालयाचे प्रा. राहिल कुरैशी प्रा. डॉ. राजेश बहुरूपी, प्रा. सोमेश्वर बासेकर यांनी सुध्दा श्रमदानाच्या कामात हातभार लावला.

दुपारच्या सत्रात **'स्त्रियांचे आत्मसंरक्षण – आजच्या काळाची गरज'** या विषयावर मा. शिवाली देशपांडे, (रिटायर्ड फ्लाईंग ऑफिसर, प्रहार, नागपूर) यांनी शिबारार्थिना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादीवार होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मा. सौ. शिल्पा गुरडवार ( लुपिन फाऊंडेशन, सी. एस. आर. प्रकल्प समन्वयक, मिहान, नागपूर) या होत्या. सदर मार्गदर्शन कार्यक्रमात मा. शिवाली देशपांडे यांनी महिलांची संपूर्ण क्षेत्रात असलेली महत्वपूर्ण कामगिरी रा.से.यो. च्या स्वयंसेवकांना तसेच अड्याळ गावातील जनतेला व बचत गटातील महिलांसमोर सांगितली. महिलांनी यापुढे अबला न राहता सबला बनण्याची गरज आहे हे पटवून दिले. यावेळी त्यांनी स्वतःचे अनुभव सांगून आत्मसंरक्षणाच्या विविध क्लुप्त्या सांगून प्रहार मिल्ट्री स्कुलच्या विद्यार्थिनी कु रिया पिसे तसेच कु. वैष्णवी देशमुख यांनी प्रात्यक्षिके करून दाखविलीत. प्रात्यक्षिकानंतर मा. शिल्पा गुरडवार ( लुपिन फाउंडेशन, मिहान, नागपूर) यांनीही स्त्रियांच्या आत्मसंरक्षणाच्या आवश्यकतेविषयीची कळकळ आपल्या भाषणातून व्यक्त केली. या नंतर **'राष्ट्रनिर्माण कार्यात युवकांची भूमिका'** या विषयावर मा. डॉ. सुनिल शिंदे ( भिवापूर महाविद्यालय, भिवापूर) यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमात वक्त्याने राष्ट्रनिर्मितीत युवकांचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमात प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण, तसेच प्रा. डॉ. मंगेश कडू उपस्थित होते.

संध्याकाळी ६.०० वाजता बौध्दीक खेळ व मैदानी खेळ घेण्यात आले. त्यानंतर रासेयोत असलेल्या सर्व सहभागी शिबीरार्थींची परीक्षा घेण्यात आली. सात दिवसात झालेल्या कार्यक्रमाच्या व राष्ट्रीय सेवा योजना संबधीचे तसेच जनरल नॉलेजच्या संबंधीत प्रश्न परीक्षेत विचारले गेले होते. या परीक्षेत प्रथम आलेल्या स्वयंसेवकाला समारोपीय कार्यक्रमात पारितोषिक देण्यात आले.

**दिनांक–२६/०१/२०१६**

सकाळी ६.०० वाजता प्रार्थना झाली. चहा नास्ता घेतल्यानंतर प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी शिबिरातील स्वयंसेवकांनी तयारी केली. जि. प. उच्च प्रा. शाळा, अड्याळ येथे प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमात संपूर्ण

शिबिरार्थ्यांनीतसेच कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. शाळेतील विद्यार्थ्यांसोबतच शिबिरातील स्वयंसेवकांनीही प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला. यानंतर स्वयंसेवक समारोपीय कार्यक्रमाच्या तयारीला लागले.

शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज उपस्थित होते. विशेष अतिथी तथा मार्गदर्शक म्हणून मा. श्री. शीतलकुमार यादव तहसीलदार, तहसील कार्यालय, भिवापूर हे होते. प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. दिलीपजी गुप्ता, सामाजिक कार्यकर्ता, भिवापूर, मा. श्री. प्रभाकर मेहेरे साहेब, गट शिक्षणा धिकारी, पंचायत समिती, भिवापूर, मा. श्री. ओंकारनाथ दाणी, मुख्याध्यापक जि. प. उच्च प्राथमिक शाळा, अड्याळ तसेच मा. श्री. माटे, केंद्रप्रमुख, भिवापूर हे होते. समारोपीय कार्यक्रमात मा. अतिथींनी रा.से.यो. च्या स्वयंसेवकांना आजच्या स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी युवकांनी काय करावे याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे जेष्ठ प्रा. डॉ शिंदे डॉ. चव्हाण तसेच डॉ. शेंडे तसेच संपूर्ण शिक्षकेत्तर कर्मचारीही उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी शिबीर कालावधीत उत्कृष्ट योगदान देणाऱ्या **'सम्यक ग्रुप'** ला प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आले. शिबिर दरम्यान कु. सोनल ढोणे हिला उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून घोषित करण्यात येऊन भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी कु. शामली नागोसे, श्री प्रशांत ठाकरे तसेच रासेयो प्रतिनिधी कु. मयुरी नंदरधने यांनी आपली मनोगते व्यक्त केली. समारोपीय कार्यक्रमात अहवाल वाचनाचे कार्य प्रा. डॉ. नंदनवार यांनी केले तर संचालन डॉ. अनिता महावादीवार यांनी केले. मान्यवरांचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे यांनी मानले.

शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रासेयोच्या सर्व विद्यार्थ्यांनी अथक प्रयत्न केले.

समारोपीय कार्यक्रमानंतर दत्तक ग्राम अड्याळ येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वागत फलकाचे अनावरन समारोपीय कार्यक्रमाला आलेल्या मान्यवरांच्या हस्ते पार पडले.


**रक्तदान शिबीर :**

दिनांक ०२ फरवरी २०१६ ला **स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या ८५ व्या जयंती निमित्य भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन** करण्यात आले होते. मा. स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला उजाळा मिळावा म्हणून जीवन ज्योती ब्लड अॅन्ड कंपोनेन्ट्स, नागपूर यांच्या सौजन्याने भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत दि.०२/०२/२०१६ ला रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर घेण्यात आले. या रक्तदान शिबिरात १०६ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर १५४ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. या शिबिरासाठी जीवन ज्योती ब्लड अॅन्ड कंपोनेन्ट्स, नागपूरचे मिस रचेल मॅथ्यु, मिस शिजा अनिश, मिस प्रेरणा नाईक, मि. स्वप्नील वघे, मि. लोकेश देशमुख, निलेश मेश्राम, आसीफ कुरैशी, दिनेश रामटेके, राजेश चौधरी, अरूण मोरांडे, मिस सुनिता शेन्डे, किशोर खोब्रागडे, संजय नागपूरे यांनी रक्त संकलनाचे कार्य केले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी रक्तदान करून केले. याप्रसंगी प्रा. डॉ. विजय दिघोरे, प्रा. डॉ. सुनिल शिंदे, प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण, प्रा. किशोर शेंडे, प्रा. अनिता महावादीवार प्रामुख्याने उपस्थित होते.

रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, डॉ. मोतीराज चव्हाण, डॉ. सुनिल शिंदे, डॉ. अनिता महावादीवार तसेच रा. से.यो. मधील विद्यार्थी श्री. चेतन बाते, श्री गोपाल पाटील, कु. मयुरी नंदरधने, श्री परीक्षीत कावळे, कु. अश्विनी वैद्य, कु. कोमल ढोणे, कु. अंकींता डहारे, श्री शुभम धनविजय इत्यादिनी अथक परिश्रम घेतले.

भिवापूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाची वाढती यशस्वीता ही उल्लेखनीय बाब समजावी लागेल. याचे सर्व श्रेय संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. भाऊसाहेब मुळक, संस्थेचे नवनियुक्त अध्यक्षा श्रीमती सुमनमाला मुळक, संस्थेचे सचिव मा. माजी नामदार राजेंद्रजी मुळक (राज्यमंत्री, प्रशासकीय अधिकारी मा. डी. के. महाडिक, संस्थेच्या मॅनेजींग डायरेक्टर श्रीमती प्रेरणाताई मुळक, व्यवस्थापन मंडळाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व रा.से.यो. च्या सर्व लोकांना जाते. या सर्वांनी ज्या आत्मीयतेने सहकार्य केले त्यांचा मी सदैव ऋणी राहीन. त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जी धडपड दाखविली आणि कार्यक्रम यशस्वी केले त्याबद्दल मी सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे.

**प्रा. डॉ. विजय दिघोरे**
**रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी**





# भिवापूर महाविद्यालय भिवापूर
# शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग
# वार्षिक अहवाल- सत्र- २०१५-१६

शारीरिक शिक्षण हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. जीवनामध्ये यशस्वी होण्याकरीता शारीरिक तंदुरुस्ती

सुदधा महत्वाची असते. उत्तम आरोग्य असल्यावरच मनुष्य संघर्ष करू शकतो.

दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षी सुदधा सत्राच्या सुरूवातील क्रीडाविभागाची सर्वसाधारणसभा घेण्यात येवून त्यात क्रीडाविभागाद्वारे घेण्यात

येणाऱ्या कार्यक्रमाचे नियोजन आखण्यात आले.

रा.तु.म. नागपूर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेमधील कबड्डी, खो–खो ऐथलॅटिक्स या

खेळात प्रवेश निश्चित करण्यात आला.

दिनांक १५ ऑगस्ट २०१५ ला स्वातंत्रदिनाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्य आणि २६ जानेवारी २०१६ ला ६६ व्या गणराज्य

दिनानिमित्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या शुभ हस्ते महाविद्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला.

ह्या प्रसंगी भिवापूरमधील प्रतिष्ठित नागरीक, महाविद्यालयाचे प्राध्यापक कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर लगेच विद्यार्थ्यांना मद्यपान, पान, तंबाखू व इतर वाईट व्यसनांपासून दूर राहण्याकरीता शपथ देण्यात आली.

मुलांचा उत्साह कायम असावा व त्यांच्यामधील स्पर्धात्मक भावना वाढावी ह्या दृष्टिकोनातून वार्षिकोत्सवानिमीत्त

क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १ फेब्रुवारी २०१६ ला भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते शिव छत्रपती पुरस्कार

विजेते श्री. भुषण गोमासे यांच्याप्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करून क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. चमचा गोळी, पोता

दौड, दोन विद्यार्थ्यांचे पाय एकत्र बांधून धावणे, लांब उडी, उंच उडी, १०० मी., ४०० मी. , बॅडमिंटन, टेबल–टेनिस, कबड्डी,

खो–खो इ. वैयक्तिक व सांघिक खेळांचे आयोजन महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थि करीता करण्यात आले होते. सर्व विजयी

आणि उपविजयी खेळाडूंना स्पर्धेनंतर लगेचच पदक देऊन गौरवण्यात आले.

वार्षिकोत्सवाच्या उद्‌घाटना प्रसंगी महाविद्यालयातील B.Sc. भाग १ ची विद्यार्थीनी कु. हर्षा हरे हिचा राज्यस्तरीय

व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये उपविजयी नागपूर जिल्हा संघातून खेळल्या बद्दल महाविद्यालयाच्या वतीने Track Suit देऊन गौरव

करण्यात आला. महाविद्यालया करीता निश्चितच ही अभिमानास्पद बाब आहे.

कलर्स वाहिनी तर्फे ०७ जानेवारी २०१६ ला महाविद्यालयातील विद्यार्थीनींकरीता नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन


करण्यात आले होते. प्राथमिक आरोग्य केन्द्र, सोमनाळा यांच्या सौजन्याने दिनांक १३ व १४ जानेवारीला सिकलसेल तपासणी

शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. ह्या शिबीराचा ५२१ विद्यार्थी–विद्यार्थीनींनी लाभ घेतला.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखण्याकरीता आणि त्यांना वाईट सवयींपासून दूर ठेवण्याकरीता महाविद्यालयातील

Discipline Committee De- Addiction Committee द्वारे विद्यार्थ्यांचा आकस्मित तपासणी कार्यक्रम घेण्यात आला.





ासणी दरम्यान ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल आढळून आले त्यांच्या मोबाईलची तपासणी करण्यात येऊन त्यांना परत बाईल न आणण्याची समज देऊन परत पाठविण्यात आले.

भिवापूर परीसरातील क्रीडा संस्कृती च्या विकासाकरीता आमच्या बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी द्वारे स्वर्गीय ाऊसाहेब मुळक स्पोर्टस एकेडमी ची स्थापना महाविद्यालयात करण्यात आली. या अंतर्गत विविध खेळांचे प्रशिक्षण ीसरातील विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

आमच्या क्रीडा विभागाला बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटीचे आदरणीय सन्माननीय. श्री. राजेन्द्रभाऊ मुळक सर, ाध्यक्षा मा. श्रीमती सुमनमाला मुळक मॅडम आणि कोषाध्यक्ष मा. श्री. यशराजजी मुळक सर ह्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व हकार्य मिळत असते. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच विद्यार्थ्यांमध्ये खेळांत आवड निर्माण होत आहे. तसेच, महाविद्यालयाचे प्राचार्य ॅ. जोबी जॉर्ज सर सुद्धा विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम सुविधा देण्यावर भर दिला आहे. तसेच भिवापूर महाविद्यालयातील सर्व ाध्यापक वृंद आणि कर्मचारी ह्यांनी सुद्धा सहकार्य देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.

प्रा.आदित्य सावे
क्रीडा विभाग प्रमुख





# Glimpses









